# माणूस

शनिवार । १७ मार्च १९७९ । ७५ पैसे

## श्री. ज.
## वि. ग.
## आणि
## मी

म. श्री. दीक्षित

'माणूस' (१० मार्च)च्या अंकात आमचे सहकारी मित्र श्री. वि. ग. कानिटकर त्यांनी साहित्य परिषदेच्या निवडणुकीच्या संदर्भात श्री. ज. जोशी आणि स्वतःची जी कैफियत दिली आहे आणि जोशीबुवांना घालवण्याचे कारस्थान मी व श्री. दा. दि. कुलकर्णी यांनी केले असे भासविले आहे, ते सारे वाचून मला गंमत वाटली, वाईटही वाटले.

१ : श्री. कानिटकर हे एक कल्पक, बुद्धिमान लेखक आहेत. तीन वर्षापूर्वी त्यांना निवडून आणण्यात मी शर्थीचे यत्न केले व ही गोष्ट त्यांनी कधी नाकारली नाही. आजही मला त्यांच्या अनेक गुणांविषयी ममत्व आहे.

२ : पण साहित्यपरिषदेची घटना आणि कामकाजपद्धतीबाबत कानिटकरांनी जे लिहिले ते अपुऱ्या माहितीवर लिहिले. जोशीबुवांपूर्वीचे कार्याध्यक्ष निष्क्रिय असत व सर्व कारभार दोन कार्यवाह चालवीत या विधानाइतके असत्य काय असू शकते? संस्थेचा इतिहास व वार्षिक वृत्तांत चाळून कुणीही पहावा.

३ : श्री. ज. आणि दीक्षित रोज येत; पण रोज येऊन त्यांनी केले काय? या प्रश्नाचे उत्तर कानिटकरांना चांगले माहीत आहे. परिषदेचे दप्तर, पत्रव्यवहाराच्या फायली, सुधारलेली आर्थिक स्थिती, वाढती सभासदसंख्या, वाढता जनसंपर्क, नानाविध कार्यक्रम– या गोष्टी श्री. ज. आणि मी यांनी मुख्यतः घडविल्या आहेत. नमते घेऊन माझे मनोभावे दैनंदिन सहकार्य नसते, तर जोशीबुवांची काय स्थिती होती? डॉ. हेमंत इनामदार यांचाही आमच्या बरोबरीने सहभाग आहे. एकूण वर्धिष्णु कार्यात कानिटकर आम्हा तिघांच्या खालोखाल आहेत; पण आहेत, हे मी कबूल करतो. आकडेवारी व तपशील मी देऊ शकेन; पण कानिटकर यांनी फक्त जोशीबुवांचीच अप्रमाण प्रशंसा करावी हा इतरांवर अन्याय आहे.

४ : आता नावे मागे घेण्याबाबत चार शब्द. श्री जं. खातर कानिटकरांनी नाव मागे घेतले, हे मी समजू शकतो. ज्येष्ठ मित्र श्री. मो. रा. वाळंबे यांनी स्वतंत्रबुद्धीने आपले नाव मागे घेतले. त्यांना स्वतःबरोबर ओढण्याचा उद्योग कशाला? क्रमवार घटना घडल्या त्या अशा– श्री. ग. वा. बेहरे यांनी प्रथम स्वतःचे व श्री. वसंत कानेटकर यांचे नाव अनुक्रमे कार्याध्यक्ष व अध्यक्षपदाकरिता दाखल केले. ही दोन नावे दाखल होताच त्याची प्रतिक्रिया म्हणून श्री. ज. जोशी, वासू देशपांडे, रा. ज देशमुख यांची नावे दाखल झाली. व्यक्तिगत बिघडलेल्या संबंधातून हे सारे घडले, हे सर्व संबंधितांना ज्ञात आहे पूर्वग्रह मनी बाळगून संस्थेच्या नेतृत्वासाठी यत्न करणारी माणसे (मग ती कितीही कर्तबगार असोत) संस्थेच्या इभ्रतीपेक्षा स्वतःची इभ्रत पणाला लावतात व मग निवडणुकीला भलतेच वळण लागते. अशा स्थितीत कटुता, संघर्ष, अनिष्ट वळण टाळण्याचा यत्न कोणी केला तर त्यात लोकशाही कशी काय धोक्यात येते? जोशीबुवांना उभे रहा, लढा, म्हणण्यात लोकशाही आणि नाव मागे घेण्याची विनंती मात्र लोकशाही विरुद्ध? मतस्वातंत्र्य इतरांना नाही? निवडणूक अगदी झालीच पाहिजे का? आणि मग झाली की, दुरून गंमत पाहत बसायचे! नाही का? जो आपल्या पायावर नाव निष्ठेने खंबीर उभा असतो त्याला खरे म्हणजे कोणीच बसवू शकत नाही. जोशीबुवा मुळात प्रामाणिकपणे स्वतःहून उभे होते का? दीक्षित, दा. दि. कुलकर्णी किंवा डॉ. करंदीकर यांनी त्यांना बसवले यावर जाणकार तरी विश्वास ठेवणार नाहीत; पण जोशीबुवांनी कानिटकरांचाही सल्ला मानू नये? डॉ. वि. रा. करंदीकर यांना उभे करण्यात

मुखपृष्ठ २ वर

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक बेचाळीसावा

१७ मार्च १९७९

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४५९

¤


....मुखपृष्ठ १ वरून

श्री. ज, वि. ग., मी स्वतः, दा. दि. कुलकर्णी आणि आमचे इतर काही सहकारी सर्व होतो. त्यासाठी मला ग. वा. बेहऱ्यांचा रागही ओढवून घ्यावा लागला. ग. वा. बेहऱ्यांच्या स्नेहापेक्षा मला संस्था मोठी आहे. संस्थेच्या हितापुढे मी मैत्री, स्नेह गौण मानतो. खरी गोष्ट अशी की, जोशीबुवांना एका विशिष्ट गंभीर परिस्थितीत अध्यक्ष-पदासाठी सर्वप्रथम मी आग्रह केला; त्यांनी दा. दि. कुलकर्णींचा सल्ला घेऊन अर्ज भरला आणि शेवटच्या घटकेला कानिट-करांचेही न ऐकता इतरांचे ऐकून नाव मागे घेतले. श्री ज. हे आपल्या वाङ्मयीन कर्तृत्वाने आणि गेल्या तीन वर्षांतील परिषदेच्या भरघोस सेवेमुळे सभासदांना चांगले परिचित झाले होते. असे असता त्यांनी आपले नाव, प्रेशरखाली वा इतरांच्या इच्छेखातर मागे घेतले, याचा स्पष्टार्थ हा आहे की, ते मना-पासून उभेच नव्हते! ‘स्वतःला उगाच लहान समजणारे मोठे लेखक, हा या घटनेचा कटु, पण सत्य बोध आहे. हे सारे पुराण पुष्कळ तपशिलाने वाढवता येईल. आता झाले ते झाले. मी आणि दा. दि. कुलकर्णी आणि विशेषतः डॉ. वि. रा. करंदीकर यांनी जोशीबुवांना परिषदेतून ढकलण्याचे कार-स्थान केले असे सूचित करून, आम्हावर मात्र राम–शास्त्रींनी अन्याय केला!

तीन वर्षे खांद्याला खांदा लावून परि-षदेची सर्वांनी निरपेक्ष सेवा बजावली आणि आता निरोपप्रसंगी असे लिहिण्याचा प्रसंग यावा याचे मला कष्ट होताहेत. ग. वा. बेंना खूष ठेवण्यासाठी श्रीजंना ढकलण्यात माझा कोणता लाभ आहे ? बेहेऱ्यांच्या घरी अधून-मधून जायचे, एरवी त्यांच्याबरोबर गप्पा-गोष्टीत रंगायचे, (अगदी परवापर्यंत जोशी-बुवासुद्धा) आणि त्यांच्याशी असणारा माझा संपर्क मात्र आक्षेपार्ह ठरवायचा! मला असली ढोंगे येत नाहीत. ‘आनंदी–गोपाळ’-कर्ते या सर्व प्रकरणी कै. गोपाळराव जोश्यां-प्रमाणे वागले व दोलायमान अवस्थेत त्यांनी आपणहून स्वतःचा बळी दिला, हे दुर्दैवी सत्य आहे! मला व दा. दिंना आरोपी कर-ण्यात कानिटकरांनी स्वतःची बिनधास्त सोय पाहिली. वाईट वाटले. राग नाही. श्री. ज., वि. ग. आणि मी यांच्या स्नेहात अंतर पडू नये. मी तसे पडू देणार नाही.

श्री. बेहेरे यांच्या नाव मागे घेण्याने रा. ज. देशमुख मागे हटले, हा संस्थेच्या दृष्टीने सर्वांत मोठा लाभ! त्यासाठी जोशीबुवां-सारखा मोहरा खर्ची पडला याचे मलाही वि. गं. इतकेच वाईट वाटते. ¤

## प्रतिक्रिया

¤ गेल्या चार अंकात दि. बा. मोकाशी यांचे ‘संध्याकाळचे पुणे’ हे सदर मी वाचीत आहे. साप्ताहिकाच्या वेळापत्रकानुसार म्हणजे काहीसे घाई-गर्दीने लिहिणे हा मोकाशींचा लेखनस्वभाव नाही असे असूनही त्यांच्या प्रसन्न लेखनशैलीची सगळी श्रीमंती त्यांच्या या लेखनातून व्यक्त होत आहे. थोडेसे प्रकृतिस्वास्थ्य त्यांना लाभताच, आपण त्यांना ‘लिहिते केले’ हे फारच छान झाले.

त्यांच्या मागील अंकातील एका लेखावर प्रा. सोवनी यांनी लिहिलेले पत्र मी वाचले. छापून येणारी शास्त्रीय माहिती ही जास्तीत जास्त बरोबर असावी हा प्रा. सोवनी यांचा आग्रह योग्यच आहे; पण मोकाशी यांच्या ललित लेखनाचे, अचूक माहिती हे आकर्षण माझ्यासारख्यांना नाही. सायं-काळच्या पुण्याचे त्यांच्यातील लेखकाला होणारे दर्शन, हे मला वाटते, महत्त्वाचे आहे. कोलारच्या सोन्याच्या खाणीसंबंधी त्यांची माहिती चूक आहे, यात तर मुळीच आश्चर्य नाही. हिरे, माणके, सोने यांच्याशी लेखकाचे फारसे नाते नसते आणि त्याने ते ठवूही नये.

इथे खरे म्हणजे माझे पत्र संपले होते; पण आताच श्री. म. श्री. दीक्षित यांचे ‘माणूस’कडे आलेले पत्र आपण मला

फोनवर सांगितले. त्यावरची माझी प्रतिक्रियाही लगेच लिहितो.

१ : साहित्य परिषदेची घटना आणि कामकाजपद्धती यावर मी जे लिहिले ते अपुऱ्या माहितीवर लिहिले, हा श्री. दीक्षित यांचा आरोप मला एकदम मान्य. कारण परिषदेच्या घटनेची यथायोग्य माहिती देणे हा माझ्या लेखाचा हेतू नव्हता. 'मी उभा का नाही ?' हे मुख्यतः मला सांगायचे होते. परिषदेची घटना आणि कामकाज याबद्दल म. श्री. इतका माहितगार माणूस आज तरी पुण्यात दुसरा नाही. पुण्याबाहेर तर असूच शकत नाही !

२ : 'परिषदेत येऊन रोज केले काय ?' हा प्रश्न मी श्री. ज. व म. श्री. यांना विचारलेला नाही. माझ्या लेखाचा संपूर्ण संदर्भ असा आहे —

'आम्ही चौघे सतत तीन वर्षे जवळजवळ रोज सकाळी अथवा सायंकाळी परिषदेत येत होतो. यात एकही दिवस न चुकता श्री. ज. व म. श्री. यांनी परिश्रम केले —'

यानंतर माझे वाक्य येते —

'रोज येऊन केले काय ? हा पुढचा प्रश्न —'

हा प्रश्न आम्हा चौघांच्या संदर्भात आहे. श्री. ज. यांनी सर्वांत जास्त परिश्रम केले. म. श्री.नीही केले. मी सर्वांत कमी काम केले. हे मला एकदम मंजूरच आहे. इतकेच नव्हे तर वर्गात पाचवा मुलगाच नसल्यामुळे, दीक्षितमास्तरांनी मला चौथा नंबर दिला आहे, याबद्दलही माझी तक्रार नाही ! हा, आता मी फक्त जोशी यांचीच अप्रमाण प्रशंसा केली, यामुळे इतरांवर म्हणजे दीक्षितांवर अन्याय झाला, असे जे त्यांचे म्हणणे आहे त्याबद्दल सांगितले पाहिजे.

समजा, आपण आपल्या आजारी मित्राबरोबर डॉक्टरांकडे गेलो. डॉक्टरांनी मित्राला तपासून औषध दिले, टॉनिके लिहून दिली आणि आपल्याकडे पाहिलेसुद्धा नाही, तर आपण भोकाड का पसरायचे ? — डॉक्टरांनी त्याला मात्र तपासला, टॉनिके दिली; आम्हाला मात्र तपासले नाही — टॉनिक सुद्धा दिले नाही ! सत्यसाईबाबा, श्रीमंतांना — मंत्र्यांना सोन्याची अंगठी हवेतून काढून देतात, माझ्यासारख्याला नुसते दर्शन ! साहजिकच आहे, अहो, जे श्रीमंत असूनही दुःखी आहेत, अधिकार हाती असूनही काळजीग्रस्त आहेत. त्यांना अंगठीची गरज होती. माझ्याजवळ दुःख अथवा काळजी यातले काहीच नसल्याने मला ती दिली नाही !

श्री. बेहेरे यांच्या समाधानाखातर मान्यवरांनी जेव्हा श्री. ज. यांना 'नाव मागे घ्या' म्हणून सांगितले तेव्हा श्री. ज. ना काही वाटलेच नसेल का ? मला वाटते विषाद असेल तिथे फुंकर घालताना प्रमाण पाळूच नये. याचा अर्थ मी श्री. जं.ची उगाच भलावण केली असा नाही. दीक्षितांची प्रशंसा कमी का केली एवढेच यावरून स्पष्ट व्हावे.

३ : मो. रा. वाळंबे यांनी नाव मागे घेतले, एवढेच मी सांगितले आहे. मी लिहिले ते फक्त माझ्यापुरते आहे, हे मी माझ्या लेखात नमूद केले आहे. कुणाला ओढण्याइतका व ढकलण्याइतका कर्तृत्ववान मी नाही.

४ : श्री. जं. ना मी 'नाव मागे घेऊ नका', असे सांगितले आणि त्यांनी माझे ऐकले नाही. माझे सर्वांनी ऐकावे असे मला वाटत नाही. कारण मी चूक असणेही शक्य असतेच. श्री. जं.नी 'कटुता नको'वाल्यांचे ऐकले.

काय अनुभव आला ? नाव मागे घेऊन 'कटुता टळली का ?' 'सोबत'कारांनी डॉ. वि. रा. करंदीकर यांना आश्वासन थोडेच दिले होते की, कटुता टळावी म्हणून मी श्री. जं. विरुद्ध काही लिहिणार नाही ! आता ज्यांनी श्री. बेहेरे यांच्या आग्रहाखातर श्री. जं. ना मागे ओढले, त्यांनी आणि स्वतः श्री. ज. यांनी विचार करावा की, आपण केले ते बरोबर केले का ?

५ : दीक्षितांनी लेखाच्या शेवटी 'सिक्सर' मारली आहे ते म्हणतात —

'श्री. बेहेरे यांच्या नाव मागे घेण्याने रा. ज. देशमुख मागे हटले, हा संस्थेचा सर्वांत मोठा लाभ ! त्यासाठी जोशीबुवांसारखा मोहरा खर्ची पडला याचे मलाही वि. गं. इतकेच वाईट वाटते !'

अरे तिच्या ! श्री ज. हा 'मोहरा' आहे. ते खर्ची पडले याचे माझ्याइतकेच दीक्षितांनाही वाईट वाटले. मग दीक्षितांचे माझ्या लेखाबाबत म्हणणे तरी काय ? मोहरा खर्ची 'पडण्यापूर्वी' दीक्षित आदी इतर मान्यवरांना वाईट वाटायला हवे होते, एवढाच माझ्या मूळ लेखाचा आशय आहे. 'नंतर' वाईट वाटले हेदेखील कमी नाही !

६ : रा. ज. देशमुख हटले वगैरे माहिती मला संपूर्णपणे नवीन आहे. परिषदेबाबत दीक्षितांइतका माहितगार माणूस पुण्यात दुसरा कुणी नाही याचा हा आणखी मूळ पुरावा.

७ : असो. म. श्री. दीक्षित होणाऱ्या निवडणुकीत निवडून येणे मला अगत्याचे वाटते. परिषदेवर त्यांचे प्रेम आहे. त्यांनी परिषदेची विविध नात्यांनी सेवा केलेली आहे. म्हणूनच त्यांनी माझ्या लेखावर पोटतिडिकेने प्रतिक्रिया व्यक्त केली. माझ्या लेखात परिषदविषयक कामाचा अथवा त्यांच्या माझ्यावरील लोभाचा अनादर ध्वनित करणारे काही आले असल्यास, तो माझ्या लेखणीचा दोष समजून त्यांनी राग मानू नये, अशी त्यांना विनंती आहे.

**—वि. ग. कानिटकर**

---

दि. १० मार्चच्या 'माणूस'च्या अंकात 'मुंबई वार्ता' या सदरामध्ये 'धूम्रपानविरोधी दिन'विषयीची वार्ता मलपृष्ठ १ वर दिली आहे. त्या ठिकाणी धूम्रपान करणाऱ्यांमध्ये कॅन्सरचे प्रमाण चुकीने 'दर दहा लक्षास' असे दिले गेले आहे. ते 'दर एक लक्षास' असे आहे.

---

# निदान लाचेचा दर जरी कमी झाला तरी...

आमच्या गावाकडून तालुक्याला जाणारी एकच एस्. टी.

मग दिवसभर शुकशुकाट.

एखादा चुकार ट्रक भेटला तर भेटला.

नाही तर दुसऱ्या दिवसापर्यंत खोळंबणे आले. त्यामुळे आजही गाडी रोजच्यासारखी भरलेली.

मधल्या अंतरात चार-पाच स्टॉप्स; पण थांबल्यासारखे करून गाडी तशीच पुढे सरकायची.

पण त्या दिवशी मधल्या गावाला गाडी थांबली. पंधरा-वीसजण गाडीची वाट बघत थांबलेले. गाडी आधीच गच्च भरलेली.

त्यामुळे त्यांना आत घ्यायला कंडक्टर राजी होईना.

मंडळी तालुक्याच्या गावाला 'लग्नाचा बस्ता' बांधायला निघालेली.

शेवटी ड्रायव्हरने 'मिटवून घे' म्हटल्यावर कंडक्टरने सगळ्यांना आत घेतले.

मंडळींना फक्त अकरा रुपये आणि एका नारळाची 'दक्षिणा' द्यावी लागली.

□

चौकातल्या पानपट्टीवर मी उभा.

समोरचा भरून वाहाणारा रस्ता.

अखंड चाललेला गजबजाट. मोटारींचे कर्कश्य भोंगे.

समोरच्या दगडी चौकोनावर ट्रॅफिक-पोलीस.

गर्दीतून रस्ता शोधत एक मोटारसायकलस्वार चाललेला.

वेषावरून खेड्यातला वाटावा असा.

पोलिसाची शिट्टी वाजली. तो स्वार थांबला.

शिट्टी आपल्यासाठीच वाजली हे लक्षात आल्यावर गाडी रस्त्याच्या कडेला घेऊन थांबला. पोलीस पोचला होताच.

पोलिसाने परवाना मागितला.

खिसे खाली-वर करत त्याने नकारार्थी मान हलवली.

त्याच्या चेहऱ्यावर अजिजी

पोलिसाच्या चेहऱ्यावर अरेरावी.

थोडा वेळ त्यांची वादावादी.

शेवटी फक्त दहा रुपयांच्या नोटेवर पोलिसाने आपली भूक भागवली.

□

रबर स्टॅम्पची ऑर्डर घेऊन माल पुरविणारा माझा एक मित्र.

त्याच्या दुकानात आमचा नेहमीचा अड्डा.

त्या दिवशीही आमचे चार-पाच जणांचे गप्पाष्टक जमलेले.

कॉलेजच्या ऑफिसमधला एक क्लार्क त्याच वेळी तिथे आला.

मित्राने न बोलता स्टॅम्पचे एक खोके त्याच्या पुढ्यात सारले.

मित्राने 'बिलबुक' समोर ओढले.

त्याने विचारले, 'किती झाले?'

'पन्नास', मित्राचे उत्तर.

'पंचावन्न लावा!'

मित्राने त्याच्याकडे बघितले— तो स्टॅम्प बघण्यात गर्क.

पंचावन्नचे बिल तयार झाले.

दहाच्या पाच नोटा मित्राने कॅशमध्ये सारल्या.

पाच रुपये 'कमिशन'वर त्याने समाधान मानले.

पाच रुपयांच्या किरकोळ फटक्याने कॉलेज थोडेच बंद पडणार होते!

□

मरणकळा आलेले 'नगर परिषदे'चे सिव्हिल हॉस्पिटल.

मित्र खनपटीलाच बसला म्हणून त्याच्याबरोबर निघालो.

त्याला कुत्रे चावलेले.

नर्सकडे गेलो. तिने मलमपट्टी केली.

इंजेक्शनसाठी डॉक्टरांना भेटायला सांगितले.

डॉक्टरांच्याकडे गेलो. त्यांनी इंजेक्शनचा ग्लोब शिल्लक नाही, म्हणून सांगितले. प्रत्यक्ष डॉक्टरनी सांगितले— विश्वास ठेवणे भाग होते.

बाहेर पडलो. गेटपर्यंत आलो. मागून हाक आली.

हॉस्पिटलमधला मलमपट्टी करताना भटलेला वॉर्डबॉय बोलावत होता.

'डॉक्टर काय म्हणाला?'

'इंजेक्शन शिल्लक नाही म्हणाले!'

त्यानं डॉक्टरना शिवी हासडली.

पाच बोटे दाखवत म्हणाला, 'देणार का?'

'विषाची' परीक्षा बघण्यात अर्थ नव्हता. इंजेक्शन घ्यायला हवे होते. परत नर्सकडे आलो. तिने इंजेक्शन दिले.

डॉक्टरला शिव्या घालत तो बॉय गेटपर्यंत पोचवायला आला.

पाच रुपये घेऊन परत फिरला.

एक-दोन का असे किती तरी प्रसंग—

प्रत्येकाला पावलोपावली अनुभवायला मिळणारे.

आपल्या देशात रुजलेला भ्रष्टाचार सगळ्यांच्या अंगवळणी पडलाय

'हे असंच चालायचं!'

'याला सोल्यूशन नाही!'

'आभाळच फाटलंय, ठिगळं कुठपर्यंत लावायची!'

'ही बिळं बुजवायलाच हवीत!'

सगळेच हताश.

१९७४ साल.

गुजराथमध्ये 'नवनिर्माण समिती'ने भ्रष्टाचारविरोधी जंग छेडले होते. बिहारही त्या पाठोपाठ लढाईत उतरला. त्याचे पडसाद देशभर उमटले होते. भ्रष्ट शासनाला सावधान करणारे मोर्चे देशाच्या कानाकोपऱ्यातून निघत होते. सगळे विरोधी पक्ष आपले स्वतंत्र अस्तित्व विसरून त्यात उतरले होते.

त्याने दिल्लीचं तख्त हादरले—डळमळीत झाले आणि शेवटी कोसळले!

मतपेटीने क्रांती केली. आंदोलनाचे पाठीराखे सत्तारूढ झाले; पण फलश्रुती?

पुन्हा पहिले पाढे पहिले पंचावन्न.

आशेने पालवलेली माणसे निराश झाली.

विधानसभेच्या निवडणूक-प्रचारासाठी राहुरी तालुक्यात गेलो होतो. तिथे एक प्राध्यापक भेटले. मूळचे उत्तर भारतातले.

बरेच कळवळून बोलले, तिथल्या लोकांविषयी, दारिद्र्याविषयी, भ्रष्टाचाराविषयी.

म्हणाले, 'भ्रष्टाचार असू दे; हटला नाही तरी चालेल, तशी अपेक्षाही नाही; पण लाचेचा दर जरी कमी झाला, पाचच्या ठिकाणी तीन जरी झाला तरी जनता पक्षाला या देशावर वीस-पंचवीस वर्षे सुखनैव राज्य करता येईल—

जनता पक्षाच्या प्रचाराला गेलेल्या आम्हाला त्यांना नुस्ते आश्वासन देण्याचे धैर्यही झाले नाही!

—विनय गुणे, संगमनेर

पुणे वार्ता । लता भिसे

# स्त्री-मुक्तीची ही ललकारी !

गुरुवार दि. ८ मार्च. दुपारचे दोन वाजले आहेत. मंडईत नेहमीसारखी दुपार रेंगाळते आहे. उन्हाचा तडाखा जाणवतोय. टिळक-पुतळ्यापाशी एकएक करत बायका जमायला लागल्या आहेत. पुण्यातल्या बऱ्याचशा संघटना एकत्र येऊन आंतरराष्ट्रीय महिला-दिवस 'मागणी-दिन' म्हणून पाळण्यासाठी कलेक्टर कचेरीवर मोर्चा काढणार आहेत. बॅनर्स उभे केले जात आहेत. आलेल्या बायका टिळक-पुतळ्याच्या आवारात सावलीला बसताहेत. घोषणा सुरू होत आहेत. ३।-३॥ च्या सुमारास मोर्चा सुरू होतो. मोर्चाच्या आघाडीलाच 'स्त्रिया स्वतःच झगडून स्वतःला मुक्त करून घेतील !' असा मोठा बॅनर आहे. ७००-७५० महिलांचा मोर्चा पुढे सरकतोय. जाड खाकी पातळात घामाघूम झालेल्या महिला-पोलिसांचा बंदोबस्त आहे. शिवाय पुरुष-पोलिसही मोठ्या प्रमाणावर ! मोर्चाची मागणी आहे 'पाळणाघरं झालीच पाहिजेत !' वाटेत एक कॉमेंट ऐकायला येते 'पोरं कुणाची ? आणि पाळणाघरं कोणी द्यायची ?' बोलणारा सायकलवर पसार होतो. ऐकून बायका चिडतात. घोषणा चालू राहतात. पुढे एका चौकात नेहमीप्रमाणे गाय मोर्चात शिरते. एका बाईला शिंग मारते. तिच्या डोक्यातून रक्त वाहायला लागते. 'पोलीस एवढे बदोबस्ताला असतात, आधीपासून उभे असतात. करतात काय ?' बायकांच बोलणं चालू होतं. पुन्हा घोषणांचा जोर ! मोर्चा एम्प्लॉयमेंट एक्सचेंजवर येतो. नाव, गाव, वय, पत्ता, शिक्षण आदी भरून आणलेले हजारो फॉर्म्स कार्यकर्त्या अधिकाऱ्यांना देतात. त्यांच्या नियमाप्रमाणे फॉर्म नसल्याने ते फॉर्म स्वीकारीत नाहीत. एकीकडे 'काम द्या, काम द्या, नाही तर बेकारभत्ता द्या !' असा घोषणांचा भडिमार चालूच असतो. मोर्चा तिथून निघतो, कलेक्टर कचेरीवर येतो. तिथे आधीच एक मोर्चा आलेला ! धर्मविषयक बिलासंबंधी निषेध करणारा ! कलेक्टर कचेरीच्या चौकात ही गर्दी होते. पोलिसांची गर्दी आणि मोर्चेवाल्यांची गर्दी ! हेल्मेट घातलेले निर्विकार चेहऱ्याचे पोलीस बघून बायका हसू लागतात. पोलिसांच्या रांगा बघून सुखदेवच्या And miles to go मधल्या पोलिसांच्या रांगांची आठवण येते ! बायकांचा मोर्चा आंबेडकर उद्यानात जातो. एकीकडे सभा सुरू होते. स्त्रियांचे शिष्टमंडळ कलेक्टरना निवेदन देण्यास जाते. कलेक्टर नसल्यामुळे किंवा अन्य कुठल्या तरी 'अपरिहार्य कारणामुळे' असेल, 'अप्पर जिल्हाधिकारी' निवेदन स्वीकारतात. एक एक जण बोलू लागतात. 'शहरातही मोठ्या प्रमाणावर बेकारी आहे. शहरीभागाला रोजगार हमी योजना लागू करावी. बायकांची बेकारी मोठी आहे.' 'बायकांना सुरक्षितता नाही ! बलात्कार करणारा काही चार-चौघांदेखत बलात्कार करीत नाही ! पुरावा मिळणार कसा ? ग्रामीण भागात दहशत इतकी असते की, बलात्कार झाला तरी पोलिसांकडे त्या जात नाहीत आणि पोलीसही तक्रार नोंदवून घेत नाहीत. म्हणून स्त्रियांच्या बलात्कार-अत्याचाराच्या चौकशीसाठी स्वतंत्र न्यायालयं नेमा !' बोलणं पाळणाघरावर आलेलं आहे. अपर जिल्हाधिकारी निर्विकारपणे ऐकून घेत आहेत. 'फॅक्टरी अॅक्टमध्ये पाळणाघराची तरतूद असूनही कारखानदार अंमलबजावणी करीत नाहीत. शासनाच्या कित्येक ऑफिसेसमध्ये स्त्रियांची संख्या मोठी असूनही पाळणाघराची सोय नाही ! बालक-वर्षाचे निमित्त घेऊन तरी पाळणाघरे स्टेशन, प्रमुख बसस्टॉप, मध्यवर्ती ठिकाणी शासनाने सुरू करावीत !' तियून मुद्दा भाववाढ, वस्तूंच्या टंचाईवर येतो ! 'बजेट जाहीर झालेलं असलं तरी बऱ्याच ठिकाणी रॉकेल मिळत नाही. दोन दोन तास उभं राहावं तेव्हा अर्धा लिटर रॉकेल मिळतं. तेल महाग झालंय !' शिष्टमंडळातल्या बायका चिडून बोलतात, 'शासनानं दखल घेतली नाही तर आम्हाला भाववाढ, वस्तूंची टंचाई सगळ्यासाठी मोर्चे काढावे लागतील !' असा इशारा देतात. कलेक्टरना हजारो बेकार स्त्रियांनी भरून दिलेले व 'मला काम हवे आहे !' अशा शीर्षकाचे फॉर्म्स देण्यात येतात.

पुण्यातल्या स्त्रियांनी ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला-दिवस कसा साजरा केला त्याची ही थोडी झलक !

जगभर ८ मार्च हा स्त्रीवरील अन्याय-अत्याचाराचा निषेध-दिन म्हणून पाळण्यात येतो. ज्या वेळेला स्त्रियांना मताचाही हक्क नव्हता त्या काळात अमेरिकेतल्या स्त्रिया मताच्या हक्कासाठी आणि कामाचे तास आठ करा, ही मागणी घेऊन ८ मार्चला रस्त्यावर उतरल्या; म्हणून १९१० पासून ८ मार्च हा 'महिला-दिन' म्हणून पाळला जातो. युद्धाच्या कालखंडात याच दिवशी जर्मनीत क्लारा झेटकिन या स्त्री-मुक्ती चळवळीच्या कार्यकर्तीच्या नेतृत्वाखाली जर्मनीच्या युद्धखोर धोरणाचा निषेध करण्यासाठी मोठी निदर्शने झाली होती. व्हिएतनाम आणि चीन दोघांमध्ये चाललेल्या युद्धाच्या संदर्भात ८ मार्चला असलेला 'शांतते'चा संदर्भही स्फूर्तिदायक आहे.

भारतातल्या स्त्रियांच्या परिस्थितीबाबत परत परत बोलायला नको ! बहुसंख्य स्त्रियांना काम नाही, शिक्षण नाही ! दारू, जुगार, मटका अशा व्यसनांनी हजारो स्त्रियांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. स्त्रिया वेश्या होत आहेत, पोट भरण्यासाठी शरीर-विक्रय करीत आहेत आणि स्त्रीकडे उपभोग्य वस्तू म्हणून बघण्याच्या दृष्टिकोनामुळे दलित, शेतमजूर, आदिवासी स्त्रियांवरील बलात्कार आणि अत्याचाराला ऊत आला आहे. शासनाचे दुर्लक्ष करणे चालू आहे. या पार्श्वभूमीवर ८ मार्च हा 'महिला दिवस' स्त्रिया 'मागणी-दिन' म्हणून पाळतात याला खरोखरच महत्त्व आहे.

पुण्याच्या मोर्चात सुशिक्षित स्त्रिया कमी प्रमाणात होत्या. मोठ्या प्रमाणावर होत्या त्या महानगरपालिकेतल्या सफाई-सेविका, हमाल-स्त्रिया, मांजरी फार्मच्या शेतमजूर

स्त्रिया, बिडीकामगार ! काही जणी खाडे करून मोर्चाला आल्या होत्या. बोपोडी, दापोडी, गंज पेठ, येरवडा, तळेगाव, औंध, सहकारनगर, मांजरी फार्म इतक्या लांबवरून स्त्रिया मोर्चाला आल्या होत्या. दिवसेंदिवस वाढणारी महागाई, बेकारी, अपुरे वेतन या पार्श्वभूमीवर मोर्चामध्ये तळागाळातल्या निरक्षर स्त्रिया जागृतीने याव्यात हे खरोखरच लक्षणीय आहे. सर्व श्रमिक संघ, श्रमिक महिला समिती, समाजवादी महिला सभा-संयुक्त स्त्री संस्था, अ. भा. स्त्री शक्ती संघटना इत्यादी संघटनांनी एकत्र येऊन स्वत:मध्ये असलेले वैचारिक मतभेद बाजूला ठेवून एकत्र यावे ही घटनासुद्धा तेवढीच लक्षणीय !

ह्या मोर्चाच्या सर्व मागण्या त्वरित मान्य होतील किंवा न होतील, पण स्त्रिया आता त्यांच्या मागण्यांवर गप्प बसून रहाणार नाहीत एवढे मात्र सिद्ध झाले आहे. मुंबईतही स्त्रीमुक्ति संघटना, ऑल इंडिया विमेन्स फेडरेशन, सर्व श्रमिक संघ, स्त्री सखी मंडळ यांनी ८ मार्च एकत्र साजरा केला. नगरला स्त्री-कार्यकर्त्यांची चर्चा बोलावली होती. श्रीरामपूर भागात रोजगार हमी योजनेच्या कामावरच्या ३०० स्त्रियांनीही निदर्शने केली.

खुर्च्या सांभाळण्यात गुंतलेले राजकारणी, पक्षातल्या गटबाजीकडे कान देऊन बसलेले सत्ताधुरंधर यांच्या कानांवर 'स्त्री-मुक्तीची ही ललकारी' केव्हा जाणार ? की ७४–७५ सालाप्रमाणे स्त्रियांनी सचिवालय ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला तरी ही मंडळी संडास-मार्गे पळून जातानाच ऐकू येणार ? □

# श्री भगवान उवाच....

### श्री अर्जुन उवाच

अर्जुन म्हणे श्रीहरी
गेलो परवा अवनीवरी
मृत्युलोकी केली फेरी
नारदासंगे ।

तयातही पुण्यपत्तने
जिथे जुने वाडे-वतने
देवळात जिथे कीर्तने
चालताती ।

तिथल्या जनांची काय हौस
समस्त स्त्रिया आणि पुरुष
जागविती एक उरुस
तीन दिवसांचा ।

कोणी एक थोर गवई
आपल्या गंधर्वांच्या सवाई
त्याच्या पुण्यतिथीच्या समयी
जाण तू ।

या उरुसामध्ये देख
येती कलावंत अनेक
जाती दावुनी झलक
स्व-कलेची ।

आणि ऐकाया त्यांते
सारे शहर लोटे
होती तल्लीन श्रोते
तीन रात्री ।

हा सारा काय प्रकार,
काय प्रकृती, काय विकार
की केवळ कालापहार
सांग तूचि ।

### श्री भगवान उवाच

नाही प्रकार, नाही विकार
नाही केवळ कालापहार
ऐक सांगतो तुजला सारं
प्रिय शिष्या ।

मनुष्यास उत्सव प्रिय
असो परका वा स्वकीय
करीतसे संस्मरणीय
सोहळा तो ।

त्यातूनही पुण्यपत्तन
कला-संस्कृतीचे मोठे जतन
पुरोगामी आणि सनातन
दोघेही करिती ।

गायनाची कला थोर
डोलवी आपुल्या मनाचा मोर
असो सज्जन अथवा चोर
रंगूनी जाई ।

याच भावे त्या शहरी
विहरती संगीताच्या लहरी
रात्रीच्या चारी प्रहरी
धनुर्धरा ।

गातसे कोणी, कोणी वाजवी
स्वप्नसुंदरी ती रात्र गाजवी
कोणी नुसतेच तंबोरा खाजवी
स्वरमंचावरी ।

भारतदेशीचे गायक-वादक
ज्येष्ठ-कनिष्ठ संगीतसाधक
पारंपारिक कोणी, कोणी सुधारक
येथ येती ।

कला दावण्या अहमहमिका
कोणी भरे रंग, कोणी पडे फिका
पुण्यनगरीचा रसिकराजा
तल्लीन होय ।

कोणाचे गायन म्हणजे मध्यंतर
गाई तो भराया वेळेचे अंतर
की सुखविण्या केवळ निजअंतर
गातसे तो ।

गाताना कोणी हात उडवी
कोणी कानावर अलगद ठेवी
आळोखे-पिळोखे देत कोणी गाई
तूच पाही ।

मलपृष्ठ २ वर

संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# साहित्य परिषद - एक स्टॉप

पुणे महानगर पालिकेच्या चार नंबरच्या बसने गेले की, टिळक रोडवर 'साहित्य-परिषदे'चा स्टॉप लागतो. या स्टॉपमुळे परिषद तमाम नागरिकांना ठाऊक झाली आहे. हे बोलणे खोचक वाटेल, पण ते खरे आहे. कारण ज्या शहरात साहित्यमंडळाला बस स्टॉप नाही तेथे पत्ता शोधीत जावे लागते. आपल्या शहरात असे एखादे मंडळ आहे, हाही बहुतेकांना पत्ता नसतो. अशा शहरातल्या साहित्यमंडळाच्या कचेऱ्या, मंडळाचे अध्यक्ष किंवा सेक्रेटरी यांच्या घरीच असतात. कधी काळी मंडळाचा कार्यक्रम ठरलाच तर कार्यकर्त्यांना खर्चासाठी मित्र-मंडळींच्या खिशात हात घालावा लागतो.

पण पुण्यातील साहित्य परिषद हा केवळ बसस्टॉप नसून साहित्यप्रेमी लोकांचाही स्टॉप झाला आहे. विशेषत: गेली तीन वर्षे अधिकारावर असलेल्या कार्यकारी मंडळाने भरगच्च साहित्यक कार्यक्रम ठेऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मुदत संपल्यामुळे हे कार्य-कारी मंडळ आता बरखास्त होऊन नवीन निवडणुका होतील. त्यांनी केलेल्या भरीव कामगिरीबद्दल कुणीही या कार्यकारिणीचे अभिनंदनच करील.

दि. ४-३-७९ रोजी सायंकाळी साडे-सहाला परिषदेच्या हॉलमध्ये होणारे व्याख्यान या कार्यकारिणीच्या अधिकारातले शेवटचे व्याख्यान होते. व्याख्यानाचा विषय होता, 'अमर-शेख-काव्य आणि कवित्व'. वक्ते होते कवी नारायण सुर्वे. येथील लोक-वाङमय प्रकाशन गृहाने अमर शेख यांचे छायाचित्र परिषदेत लावण्यासाठी भेट दिले होते. नारायण सुर्वे यांनी छायाचित्राचे अना-वरण करून व्याख्यानास सुरुवात केली. अमर शेख यांचा असा गौरव होत अस-ल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. या समा-रंभाने जुने नाते, जुने संबंध जिवंत केले, असे सांगून त्यांनी आपले व अमर शेख यांचे संबंध कसे आले, हे सांगितले. ते म्हणाले,'मी अमर शेख यांजकडून पुष्कळ शिकलो, त्या-बद्दल कृतज्ञ आहे. गाणे लिहून उपयोग होत नाही. त्याला योग्य चाल बांधायला लागते. असे ते म्हणत. गाणे लिहिले की ते एकेका शब्दावर चर्चा करीत. त्या चर्चांचा मला उपयोग झाला. अत्रे यांनी अमर शेख यांचे वर्णन 'मैदानातला महान माणूस' असे केले होते. लोकनाट्याच्या नव स्वरूपात अमर शेख यांचा सिंहाचा वाटा आहे. गणाची सुरुवात गणपती पुजवू अशी होई; ती त्यांनी 'आधी मी कर पुजीन' अशी केली. हे 'कर' कामगारांचे व शेतकऱ्यांचे होते, हे सांगा-वयास नको त्यांनी गवळणीला चाट दिली आणि वगाचा पूर्वापार नायक जो राजा त्याला हाकलून शेतकरी व कामकरी नायक केला अमर शेख हे १९४३ साली शेतकरी चळवळीत आले. त्यातून लाल बावटा पथक निघाले. संयुक्त महाराष्ट्राचे घडणीला अत्रे यांचेबरोबरीने अमर शेख यांना श्रेय द्यावे लागेल. चारशे-पाचशे हा त्यांना श्रोतृसमाज वाटत नसे. पाच हजार तरी समाज हवा, असे ते म्हणत.'

अमर शेख कम्युनिस्ट होते, हे सांगून ते पुढे म्हणाले, 'त्या काळी कलावंतांची आपापल्या पक्षाशी बांधिलकी असे. पक्षीय बांधिलकी असली की कलावंत वाईट, ही समजूत चूक आहे. पक्षाने केलेल्या चुका दाखवीत अमर शेख पक्षाशी भांडले; पण बरोबर गेले. बेचा-ळीसनंतर त्यांच्या लोकनाट्यावर दगड आले. त्यांच्या प्रेरणेने सहा हजार कलापथके महाराष्ट्रभर तयार झाली; पण तीही विरत गेली. आज त्यातले एकही नाही!

'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, त्यामधील अमर शेख यांनी गाजविलेल्या लाखा-लाखांच्या सभा या साऱ्या गोष्टी आत्ताच्या पिढीला म्हाताऱ्यांच्या हळुवार आठवणी वाटतील. नवी पिढी विचारील, कशासाठी हे केलं? त्यातून काय साधलं? स्वातंत्र्य म्हणजे काही चांगलं असतं? नव्या पिढीचे हे विचारणे काहीसे बरोबर आणि काहीसे अज्ञानमूलक आहे. प्राणिसृष्टीत काही नरांना त्यांचे कार्य होताच त्यांची मादी खाऊन टाकते. चळवळीही तेच करतात. चळवळी काही माणसांना उत्पन्न करतात आणि त्यांचे कार्य होताच त्यांना खाऊन टाकतात. अमर शेख यांचे तेच झाले!

'सहा हजार कलापथके अमर शेखांमुळे उभी राहिली. चळवळ संपताच ती विरून गेली. 'सुचत नाही,' असे अमर शेख यांना पुढे झाले. राजकीय परिस्थिती जेव्हा अस्वस्थ असते तेव्हा भावनांच्या उद्रेकातून अमर शेख निर्माण होतात; पण तशी परिस्थिती नेह-मीच कशी राहणार? परिस्थिती बदलताच नव्या परिस्थितीचे आव्हान एखाद्याच कला-वंताला घेता येते. असे दिसते की, अमर शेख यांना ते घेता आले नाही; पण हा त्यांचा दोष होऊ शकत नाही किंवा दुसऱ्या कुणा-चाही नाही' नारायण सुर्वे यांनी त्याचा दोष 'ते राजकीय मार्गदर्शनाला अपुरे पडले' असे म्हणून कम्युनिस्ट पक्षाला दिला की कम्यु-निस्ट तत्त्वज्ञानाबरोबर जाता आले नाही, म्हणून अमर शेख यांना दिला, हे मला नीटसे कळले नाही. मला एकच वाटते की, कलावंत निर्माण होतो किंवा संपतो याचा कोणत्याही पक्षाशी संबंध नाही. चळवळीत नसताही लेखक व कलावंत संपतात. दारिद्र्याबद्दल किती लिहिणार? प्रेम व श्रृंगार याबद्दल किती लिहिणार? मृत्यूबद्दल आणि परमे-श्वराबद्दल किती लिहिणार? कामगार व शेतकरी याबद्दल किती लिहिणार? हे सर्व वाटण्याचे वय येते. नारायण सुर्वे यांना पुढे ते कळेल.

नारायण सुर्वे यांनी सांगितले की, अमर शेख यांची कम्युनिस्ट पक्षाशी भांडणे झाली, तरी ते पक्षाबरोबर गेले. आपल्याकडे पुष्क-ळांची कम्युनिस्ट पक्षाशी भांडणे झाली आहेत. आयुष्यभर कम्युनिस्ट पक्षाचे काम केलेले लोक म्हातारपणी तोंडात कडवट चव घेऊन बाहेर पडलेले मला ठाऊक आहेत. आपल्या देशात

कम्युनिस्ट पक्षाची लावणी चुकीची झाली. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांच्या कम्युनिझम-विषयीच्या समजुती पोरकट होत्या आणि कला व कलावंत याविषयीच्या त्याहूनही पोरकट होत्या. मी रेडिओ-मेकॅनिक आहे म्हणून मी कामगारांचा लेखक आहे, असे मानणारे कम्युनिस्ट पुढारी होते. कै. वि. वा. हडप हे लेखक पुष्कळांना आठवत असतील. त्यांची व माझी एकदा मुंबईत 'वसंत' मासिकाच्या कचेरीत गाठ पडली असता तेथून आम्ही बोलत चौपाटीवर गेलो हडपांनी तेव्हा एक 'कम्युनिस्ट' कादंबरी लिहिली होती. त्या ओघात बोलताना ते म्हणाले, 'कॉम्रेड डांगे मला हिंदुस्तानचा मॅक्झिम गॉर्की मानतात.' हडपांनी मला हे जे सांगितले ते खरे आहे का खोटे मला ठाऊक नाही; पण लेखकाकडे पहाण्याचा इथला जो कम्युनिस्ट दृष्टिकोन आहे त्यात ते बरोबर बसते.

फार पूर्वीपासून माझा कम्युनिस्ट विचारांशी भावनिक संबंध आला. माझ्या डोळ्यांसमोर कम्युनिस्ट चळवळ वाढत होती. आमच्या शहरात ती आली ती त्यांच्या 'लोकयुद्ध' या साप्ताहिकाच्या रूपाने. कम्युनिस्ट मुले–मुली ते साप्ताहिक हातावर घेऊन, दुसऱ्या हाताने त्यातला एक अंक फडफडवीत, मथळे ओरडत विकत. हा देखावा आम्हाला नवीन होता. वर्तमानपत्रे विकणे हे काम हलके. ते सुशिक्षित मध्यम वर्गीयांनी करणे हे एस्टॅब्लिशमेंटला आव्हानच होते. पुढे एक क्षण असा आला की, कम्युनिस्ट तत्त्वज्ञान जगाला वेढणार असे वाटले. कामगार-शेतकरी यांचे राज्य होणार; पण काय झाले कुणास ठाऊक, कम्युनिस्ट पक्ष भारतात उतारास लागला. कामगारात तो पगारवाढीपुरता राहिला व विद्वानात चर्चेपुरता.

जगातले सर्व कामगार व शेतकरी एक झाले आहेत, जगभर त्यांचे एक राज्य आहे ही कल्पना इतकी बहारीची होती ! पण त्या काळातसुद्धा मला नेहमी एक शंका येई, कशावरून एक कम्युनिस्ट देश दुसऱ्या कम्युनिस्ट किंवा बिगरकम्युनिस्ट देशावर राज्य करणार नाही ? किंवा दोन कम्युनिस्ट देशांत युद्धे होणार नाहीत ? कम्युनिझम राष्ट्रीय पातळीवर राहील. असे मला वाटत होते माझी भीती आज खरी ठरली आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने जगाला पुष्कळ दिले यांत शंका नाही; पण जग एक करावयाचे असेल तर कम्युनिझमला पुढचा विचार करावा लागेल. 'राष्ट्र' भावना कम्युनिस्टांनाही मानेवरून काढता येणार नाही.

अर्थात राजकीय क्षेत्रात मला कळत नाही. यासाठीच भारतात कम्युनिझम का आला नाही, याचे कुणी रास्त विवेचन केले तर ते मला हवे आहे. ज्या पहिल्या माणसाने तो विचार इथे मांडला तो उंच होता का लठ्ठ होता, रागीट होता का रोगी किंवा मिशाळ होता, हेही मला हवे आहे. त्याचे खाजगी आयुष्य हवे आहे. त्याचा कम्युनिझमवरचा पहिला लेख किंवा भाषण हवे आहे. चूक पुढाऱ्यांची होती की अनुयायांची ? की हिंदुस्थानातील विशिष्ट विचारपद्धती आड आली ? आम्ही सर्व पंथांना व धर्मांना चकवा दिला तसा कम्यनिझमलाही दिला. आमचे काय होणार कुणास ठाऊक !

पण चिंता करण्याचे कारण नाही. कम्युनिस्टांआधी जग होते व राहणार आहे. आमच्याकडे कम्युनिझम आला नाही तरी समाजवादाची तत्त्वे मान्य झाली आहेत. सर्व पक्ष आता समाजवादातच बोलतात. राजकीय तत्त्वज्ञानाचे असेच चालू असते, कलावंतांनी तिकडे लक्ष देऊ नये. त्यांनी कलेची चिंता वाहावी. आपल्या देशातून बुद्ध धर्म गेला; पण जातककथा राहिल्या. मुसलमान गेले; पण ताजमहाल राहिला असे होते. राजकीय पक्षांवर निष्ठा ठेवणाऱ्या कलावंतांना नेहमी शेवटी फसल्यासारखेच होणार ! विनोबा जे म्हणतात की, राजे येतील-जातील पण संत राहतील, ते या संदर्भात असावे

काही असले तरी 'अमर शेख-कार्य व कवित्व' हे कवी नारायण सुर्वे यांचे व्याख्यान रंगले. त्याहूनही त्यांनी शेवटी अमर शेख यांच्या व स्वतःचीं एक अशा कविता म्हटल्या त्या रंगल्या. 'मनिऑर्डर' या सुर्व्यांच्या कवितेने चांगलाच वेध घेतला.

एकूण चालू कार्यकारिणीचा हा शेवटचा कार्यक्रम यशस्वी झाला. या कार्यकारिणीने जे काम केले त्याबद्दल पुन्हा अभिनंदन ! त्यांचे कार्य बाहेरूनही कळत होते. श्री. ज. जोशी, वि. ग. कानिटकर, म. श्री. दीक्षित यांनी देणग्या मिळविण्याचा असा सपाटा लावला होता की, त्यांच्यापैकी कुणी समोर दिसताच लोकांत पळापळ सुरू होई, असे म्हणत !

कार्यकारिणीच्या सभासदांपैकी एक सभासद वि. ग. कानिटकर आपल्या कार्यकारिणीविषयी म्हणाले, 'जसा आमचा आजचा अध्यक्ष (गं. बा. सरदार) हा ललित साहित्यात उत्तम नाव असलेला व साहित्य–संस्थांविषयी आस्था असलेला असा मागचांनंतरचा पहिला अध्यक्ष, तशीच संस्थेला स्थिर पायावर उभं करून जात असलेली ही पहिली कार्यकारिणी !'

अशाच कार्यकारिणी इतरत्र ठिकाणच्या साहित्यविषयक मंडळांना लाभोत, ही इच्छा! ☐

# निरुत्तर प्रदेश

## दुबळे केंद्रनेतृत्व

वा. दा. रानडे

उत्तर प्रदेशातील न सुटणारे पेचप्रसंग पाहिले म्हणजे त्या प्रदेशाला उत्तर प्रदेश म्हणण्यापेक्षा निरुत्तर प्रदेश म्हणणेच अधिक योग्य होईल असे वाटू लागते. पंडित गोविंद वल्लभ पंत केंद्रीय मंत्रिमंडळात गेल्यापासून तेथे कोणतेच मंत्रिमंडळ फार काळ स्थिर होऊ शकले नाही जनता पक्षाच्या राजवटीत तरी स्थैर्य येईल असे वाटले होते; पण त्या पक्षाचाही मुख्यमंत्री दोन वर्षांपेक्षा अधिक काळ टिकला नाही !

यादव गेले तरी तेथील जनता पक्षातील यादवी काही संपलेली नाही. यादवांचा पराभव करणाऱ्या बंडखोर गटाला नेतेपदाच्या निवडणुकीत काही विजय मिळविता आला नाही. यादवांच्या जागी आपल्याच गटाच्या बनारसीदासांना चरणसिंगांनी मुख्यमंत्रिपदी निवडून आणले खरे; पण विधिमंडळ जनता पक्षात दोन्ही गट जवळजवळ तुल्यबळ आहेत, हे दोन्ही वेळच्या मतदानाच्या आकड्यांवरून स्पष्ट झाले.

यादव यांचा १९० विरुद्ध १९९ अशा मतदानाने पराभव झाला होता. बनारसीदास २१२ विरुद्ध १७७ अशा मतदानाने म्हणजे ३५ मतांच्या आघाडीने निवडून आले. बंडखोर गटाला यादवांचा पराभव करताना मिळालेल्या मतांपैकी २२ मते कमी झाली व ती बनारसीदासांना मिळाली. जगजीवनराम यांच्या लोकशाहीवादी काँग्रेस गटाने बनारसीदास यांना मते द्यावीत असा आदेश त्या गटाच्या केंद्रीय नेत्यांनी दिल्याने बनारसीदासांचा विजय झाला हे उघड आहे. याचा अर्थ लोकशाहीवादी काँग्रेस गटाची सर्वच्या सर्व मते बनारसीदास यांना मिळाली असे नव्हे; पण विजय मिळविण्यास त्यांचा उपयोग झाला. विधिमंडळ पक्षात लोकशाहीवादी काँग्रेस गटाचे ४७ सभासद आहेत. त्यातल्या फक्त दहा जणांनी बनारसीदासांना मते दिली असे सांगण्यात येते, कारण केंद्रीय नेतृत्वाचा आदेश त्या गटाच्या अनेक सभासदांना पसंत नव्हता. बंडखोर गटाला मिळालेल्या १७७ मतांमध्ये सर्वांत जास्त १०३ मते जनसंघाची असून बाकीची भालोद, लोकशाहीवादी काँग्रेस, संघटना काँग्रेस यांच्यातील बंडखोर सभासदांची आहेत.

जनसंघाबाबत यादवांचेच धोरण बनारसीदास यांनी चालू ठेवले. सार्वजनिक जागी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कवायतींना यादवांनी केलेली बंदी त्यांनी मागे घेतली नाही. जनसंघाचे जे सभासद अशा कवायतीत किंवा शाखांच्या संचलनात भाग घेतात त्यांना आपण मंत्रिमंडळात घेणार नाही. असे आपले धोरण त्यांनी जाहीर केले. रा. स्व. संघाबाबत जनता पक्षाने वास्तविक सर्वत्र एकच धोरण स्वीकारायला हवे. संघावर काही निर्बंध घालण्याची आवश्यकता केंद्र सरकारला वाटत नाही; मग उत्तर प्रदेशच्या सरकारलाच निराळे धोरण स्वीकारावेसे का वाटते ? संघाचे कार्य इतर राज्यांपेक्षा उत्तर प्रदेशात काही निराळ्या प्रकारे चालू असेल असे मानण्याचे कारण नाही. संघाचा प्रभाव देशाच्या काही भागात जास्त, काही भागात कमी असेल; पण त्याची कार्यपद्धती सर्वत्र सारखीच असते. जनसंघ आणि रा. स्व. संघ यांची वैचारिक बैठक एकच आहे. जनसंघ ही रा. स्व. संघाची राजकीय शाखा म्हणून स्थापन झाला आणि आपले स्वतंत्र अस्तित्व विसर्जित करून तो जनता पक्षात समाविष्ट झालेला आहे. त्याने आपल्या स्वतंत्र अस्तित्वाचे खरोखरच विसर्जन केले आहे का असा प्रश्न जनसंघाबद्दल जसा विचारता येईल तसा जनता पक्षाच्या इतर घटकांबद्दलही विचारता येईल.

जनता पक्षातील इतर घटकांपासून जनसंघाला अलग पाडण्याचे सध्याचे प्रयत्न राजकीय शक्तींच्या फेरमांडणीचे निदर्शक समजावयाचे काय? या प्रयत्नांची अपरिहार्य परिणती जनता पक्षाच्या फुटीत होणार आहे. जनसंघाला सत्तेपासून दूर ठेवून इतर घटक आपल्या हाती सत्ता टिकवू शकतात काय याची चाचणी उत्तर प्रदेशात केली जात आहे असे दिसते; पण पक्षातील एका घटकाला सत्तेत त्याचा न्याय्य वाटा न देता दूर ठेवणे हे धोरण पक्षाची एकजूट, शिस्त आणि हित या सर्वच दृष्टींनी हानिकारक आहे. त्यात पक्षहित नसून पक्षघात आहे ! जनसंघ कार्यकर्त्यांचे धोरण व कार्यपद्धती याबाबत मतभेद असू शकतात. मलाही ते मान्य नाहीत. चार विरोधी पक्षांना एकत्र आणून एकच पक्ष स्थापन करण्याची सूचना प्रथम मांडण्यात आली त्याच वेळी मी याबाबत शंका प्रदर्शित केलेल्या होत्या; पण एकदा जनसंघाला जनता पक्षात घेतल्यानंतर त्यांच्याशी लढत द्यावयाची ती वैचारिक पातळीवर आणि पक्षांतर्गत लोकशाही पद्धतीनेच दिली पाहिजे. रा. स्व. संघाच्या शाखांवर निर्बंध घालणे, जनसंघाला सत्तेत योग्य वाटा नाकारणे हे मार्ग या दृष्टीने योग्य नव्हेत. एखाद्या राज्यात राज्यपातळीवर हे घडत असेल तर केंद्रीय नेतृत्वाने खंबीर धोरण स्वीकारून त्याला पायबंद घातला पाहिजे.

त्यासाठी केंद्रीय नेतृत्वात एकजूट हवी, ती आज नाही हीच जनता पक्षाची शोकांतिका आहे. बनारसीदास यांनी ज्या पद्धतीने मंत्रिमंडळ बनविले त्याला चरणसिंगांचा पाठिंबा आहे. जगजीवनबाबूंच्या लोकशाहीवादी काँग्रेसगटाला सात मंत्रिपदे मिळाल्याने आता जनसंघाचे काही का होईना, त्याची त्यांना फिकीर दिसत नाही. मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस आदि समाजवादी मंडळी चरणसिंगांच्याच बाजूची आहेत. उत्तर प्रदेशात जनसंघ अलग पडला आहे तर केंद्रीय नेतृत्वात, चंद्रशेखर–मोरारजीभाई अलग पडले आहेत त्यामुळे केंद्रीय कार्यकारिणी किंवा केंद्रीय संसदीय सल्लागार मंडळ राज्यपातळीच्या नेतृत्वावर खंबीर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. बनारसीदास यांच्या मंत्रिमंडळ बनविण्याच्या पद्धतीबद्दल शाब्दिक नापसंती व्यक्त करण्यापलीकडे काही करण्यास चंद्रशेखर असमर्थ असल्याचे दिसते. केंद्रीय नेतृत्वाने हस्तक्षेप करावा, अशी विनंती बंडखोर गटाने केली. त्याला चंद्रशेखर यांचे उत्तर असे की, उत्तर प्रदेशच्या राजकारणात केंद्रीय नेतृत्व हस्तक्षेप करणार नाही. बनारसीदास यांनी मंत्रिमंडळ बनविताना आमचा सल्ला घेतला नाही. आता त्यांच्यापुढे निर्माण झालेल्या पेचप्रसंगातून मार्ग त्यांचा त्यांनीच काढावा! आम्ही त्यांना वाचविणार नाही. यादवांच्या बाबतीतही अशीच भूमिका चंद्रशेखर यांनी घेतली होती. पण ही भूमिका बरोबर नाही ! राज्यपातळीवरचे नेतृत्व चुकीच्या मार्गाने जात असेल तर त्याला योग्य मार्गावर ठेवण्याची जबाबदारी केंद्रीय नेतृत्वाची आहे. मंत्रिमंडळात पक्षातील सर्व घटकांना योग्य प्रतिनिधित्व मिळायला हवे असा स्पष्ट आदेश केंद्रीय नेतृत्वाने बनारसीदास यांना द्यावयास हवा होता; पण याबाबतीत ते दुबळे ठरले

मंत्रिमंडळ बनविण्याच्या बाबतीत आपणास पूर्ण मोकळीक असली पाहिजे असा दावा यादवांप्रमाणेच बनारसीदास यांनी मांडला आहे; पण पक्ष एकसंध असतो तसे नसेल तेव्हाच या दाव्याला अर्थ असतो. तसे नसेल तेव्हा सर्व गटांना मंत्रिमंडळात योग्य प्रतिनिधित्व मिळते की नाही हे पहायची जबाबदारी केंद्रीय नेतृत्वाचीच असते. मंत्रिमंडळ बनविताना केंद्रीय नेतृत्वाचा सल्ला घेण्याची यासाठीच प्रथा पडलेली आहे. बनारसीदास यांनी या वेळी मंत्रिमंडळ बनविताना काही अनिष्ट प्रथा रूढ केल्या आहेत. सत्तावीस कॅबिनेटमंत्री नेमून त्यांनी उच्चांक केला. दुसरी गोष्ट केंद्राच्या धर्तीवर राज्यातही दोन उपमुख्यमंत्रिपदे त्यांनी निर्माण केली. आपल्याला पाठिंबा देणाऱ्या गटांना खूष राखणे हाच त्यामागे उद्देश आहे. उत्तर प्रदेशच्या घटना म्हणजे जनता पक्षाच्या विघटनांची नांदी ठरणार काय ? अशी चिंता कार्यकर्त्यांना वाटत आहे. □

# गॉर्की कॉलनी

लेखक :
**ए. एस. मकरेन्को**

अनुवाद :
**मीनाक्षी कोल्हटकर**

**कथासूत्र :** आता तबेल्याचा ताबा ब्रॅटचिन्कोने घेतला. त्याचं घोड्यांवर अतोनात प्रेम होतं. त्यामुळंच कोझियर आजारी पडला असतानाही दमलेल्या घोड्यांना त्रास द्यायला ब्रॅटचिन्को तयार झाला नाही.
याच सुमारास कॉलनीत अनपेक्षितपणे ज्यूविरोधी वातावरण निर्माण होऊ लागलं. ज्यू मुलांचा अपमान व छळ सुरू झाला. यात असादचीचा पुढाकार होता आणि त्याला तारानेटस्‌चीही साथ होती. एक दिवस आन्तोननी संतापून असादचीला हाकलून दिलं; पण या सगळ्या भानगडीत शिक्षणतंत्राचा आत्माच हरवून गेला आहे, असं त्यांना वाटू लागलं.
त्या हिवाळ्यात असादचीसकट पाच–सहा मुलं काही लफड्यात सापडली आणि त्याचं पर्यवसान पिरोगोवका गावातल्या मुलांशी हाणामारी करण्यात झालं. ग्रामपंचायतीच्या जागेचीही नासधूस झाली; पण सरपंच सज्जन निघाला. त्यानंच ते प्रकरण आपापसात मिटवून टाकण्याचा आग्रह धरला. आन्तोननीही कॉलनीतल्या कुणालाच शिक्षा केली नाही; पण पिरोगोवका गावच्या मुलांशी आम्ही दोस्तीच करू, असं वचन मात्र सगळ्यांकडून घेतलं.

### प्रकरण पंधरावे

## आमची ती सुंदरी

१९२२ च्या हिवाळ्यात आमच्याकडील मुलींचा आकडा सहापर्यंत गेला. ओल्या हुरोनोवा ही एकदम वाढली. मोठी दिसायला लागली. त्याचप्रमाणे आकर्षक पण दिसू लागली. मुले ओल्याकडे जास्त लक्ष देऊ लागली; पण ओल्या तशी हुषारच. तिने कोणालाही दाद दिली नाही. तिचा खरा दोस्त म्हणजे बुरुन! बुरुनच्या धिप्पाड शरीराचा तिला मोठा आधार वाटे. ती कॉलनीत कोणालाही भीत नसे. इतकेच काय पण प्रिखोदकोव्हच्या आराधनेला पण भीक घालीत नसे. प्रिखोदकोव्ह अतिशय ताकदवान, तितकाच खत्रुड व विक्षिप्त मुलगा होता; पण बुरुनचे काही तिच्यावर प्रेम नव्हते. ती नुसतीच निव्वळ दोस्ती होती. त्यामुळे साऱ्या कॉलनीभर त्यांच्या दोस्तीची इज्जत राखली जात असे. स्वतःच्या सौंदर्याशिवाय ओल्याने कुठल्याही बाबतीत आपले वर्चस्व दाखवले नाही. ती शेतात व बगीच्यात आवडीने काम करीत असे. तिला गाण्याची अतिशय आवड होती. ती बोलूनही दाखवी की, आपण मोठी झाल्यावर शेतकऱ्याशीच लग्न करणार!

मुलींच्यात पुढाकार घेणारी दुसरी नात्स्या नोवेवनया ही होती. ती कॉलनीत दाखल होताना तिच्याबरोबर भला मोठा कागदाचा गठ्ठा पाठवण्यात आला होता. ते तिचे केसचेच कागद होते. त्यात तिच्या पूर्वायुष्यातील घटनांची नोंद केलेली होती. ती येणेप्रमाणे–

"ती अट्टल चोर होती. तसेच चोरीचा माल विकत घेत असे. ती चोरांच्या टोळक्याची म्होरकी होती." नात्स्याबद्दल आम्हाला फार कुतूहल होते तिच्यामध्ये एक प्रकारची चमक होती. ती फक्त पंधरा वर्षांची असूनही तिच्या शरीरबांध्यामुळे सर्वांमध्ये उठून दिसे. तिच्या चालण्यात आणि वागण्यात कमालीचा आत्मविश्वास होता. जरूर पडेल तेव्हा मुलींना दम देण्यास ती कचरत नसे. मुलींच्या बाबतीतही तिची वागणूक स्पृहणीय होती. ती नुसत्या नजरेने खोड्या करणाऱ्यावर जरब बसवीत असे.

कोणी ब्रेड तुकडे करून टाकून दिली तर नात्स्या त्याला चांगलाच दम भरीत असे–"ब्रेड काय फुकटची येते काय? ब्रेड नासायला तुम्ही काय डुकरं आहात?" असे ती आपल्या भरदार आवाजात सरळसरळ विचारी आणि जरूर पडल्यास दमही देई.

नात्स्या सर्व स्त्री-शिक्षकांच्याबरोबर दोस्ती बाळगून होती. ती पुष्कळ वाचन करीत असे आणि हळूहळू ती रॅबफॅक्टच्या परीक्षेची तयारी करीत होती; पण नात्स्याच काय, काराबानोव, वेर्शनेव, झादारोव, विश्कोवस्की हेसुद्धा तिचे सहकारी होते. आमचे प्रयत्न अजून बरेच मागासलेले होते. गणित राजकारण व समाजशास्त्र या

विपयांत आम्ही बरेच मागे पडत होतो. त्यातल्या त्यात हुशार म्हणजे राइसा सोकोलोवा. तिला आम्ही किव्हच्या रॅबफॅक्ट परीक्षेला १९२१ साली पाठवलेले होते.

आम्हाला मनोमन खात्री होती की, रॅबफॅक्टची परीक्षा ही फार अवघड पल्ल्याची आहे; परंतु आमच्या स्त्री-शिक्षकवर्गाने त्यावर खूप मेहनत घेतली होती. रॅबफॅक्ट पास केलेला एक तरी विद्यार्थी कॉलनीत असावा अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. अशी मनीषा बाळगणे चांगले होते; पण राइसा याला कितपत साथ देईल याची शंका होती. परंतु तिने सबंध उन्हाळ्याच्या महिन्यात रॅबफॅक्ट परीक्षेची पूर्वतयारी केली; परंतु तिला पुस्तकाच्याकडे खेचून न्यावे लागे. तिला स्वतःला अभ्यासाची आवड अशी नव्हतीच.

झादारोव्ह, व्हेर्शनेव, काराबानोव या सर्वांना अभ्यासाची गोडी होती. राइसालापण त्यांच्या पंक्तीत आणून बसवल्याबद्दल ते नाराज होते. व्हेर्शनेव्ह हा रात्रंदिवस खूप वाचन करीत असे. लोहारखात्यातले काम सांभाळूनही फावल्या वेळात तो वाचन चालू ठेवी. तो अत्यंत प्रामाणिक व सडेतोड बोलणारा होता आणि म्हणून राइसाबद्दल तो नेहमीच 'हिचं पुढे काय होणार ?' असे उपेक्षेनेच बोले.

एक दिवस तो म्हणाला, "तुम्हाला कसं समजत नाही की राइसा एक दिवस नक्की जेलमध्ये जाईल !"

काराबानोवला तर याबद्दल पक्की खात्री होती.

झादारोव राइसाच्या अस्तित्वाची जाणीव ठेवूनही चिडवत असे, "तू काय रॅबफॅक्टची परीक्षा देणार ? त्यापेक्षा रेशमाचे मोजे विणून दाखविलेस तरी पुष्कळ झाले !"

राइसा त्या सर्वांना हसून उत्तर देई. रॅबफॅक्टला बसण्याची तिला काही खरोखरी मनापासून आवड नव्हती; पण कीव्हला जायला मिळणार या एका विचारानेच तिने हा घाट घातला होता.

मी या सगळ्या मुलांच्याबरोबर सहमत होतो. खरोखर राइसा काय दिवे लावणार याची मला जाणीव होती. परीक्षेची तयारी चालू असतानासुद्धा तिला शहरातून बारीकसारीक चिठ्ठ्या येत असत आणि काही तरी कारण काढून केव्हाच डोळा चुकवून ती शहराकडे धाव घेत असे. त्याचप्रमाणे अत्यंत गुप्तपणाने कोर्नेयेव तिला भेटत असे. कोर्नेयेव हा मुलगा कॉलनीत तीन आठवडे राहून गेलेला होता. तेवढ्या काळात त्याने अनेक चोऱ्या केल्या होत्या. त्या चोऱ्या त्याने जाणूनबुजून अत्यंत सफाईदारपणे केल्या होत्या. शेवटी तो शहरातल्या एका मोठ्या केसमध्ये अडकला. तो एका गुन्ह्यातून सुटतो न सुटतो तोच दुसऱ्या गुन्ह्यात अडकत असे. न सुधारणारी अशी ही एकच व्यक्ती ! हा माणूस अत्यंत घाणेरडा असा होता. त्याच्यात कधीही सुधारणा होणार नव्हती.

राइसा ही रॅबफॅक्टच्या पूर्वपरीक्षेत पास झाली; परंतु आम्ही एका आठवड्यानंतर बातमी ऐकली की कोर्नेयेल पण कीवला गेला आहे.

झादारोव्ह एक दिवस म्हणाला, "आता मात्र ती खरोखर धडा शिकेल !"

हिवाळा संपला. राइसा दररोज पत्रे लिहीत होती. सुरवातीसुरवातीला सर्व काही छान चालले आहे, असा आभास तिने निर्माण केला होता. पण अलीकडे आपल्याला अभ्यास फार जड जातो, असे ती लिहीत असे. खरे तर तिला भत्ता मिळत होता; परंतु ती वारंवार पैसे मागे. प्रत्येक महिन्याला आम्ही २० ते ३० रुबल तिला पाठवीत होतो. झादारोवने एकदा कळविले की, या पैशावर कोर्नेयेल मस्तपैकी रहात होता आणि हे काही खोटे नव्हते. बिचाऱ्या स्त्री-शिक्षकांनी या कीवच्या परीक्षेची शक्कल काढली. त्यांना सारेजण दोष देत व म्हणत,

"हे सर्व प्रकार आमच्या लक्षात येत होते; परंतु ते तुमच्या लक्षात येत नव्हते का येत नव्हते ते समजत नव्हते !"

जानेवारी महिन्यात राइसा एकाएकी कॉलनीत परत आली. सारे सामानसुमान घेऊन आली. आपल्याला सुट्टीवर जाण्यास परवानगी दिली असे तिने सांगितले; परंतु तिने त्या संस्थेची तशा अर्थाची काहीही चिठ्ठी किंवा पत्र आणलेले नव्हते. तिचे कॉलनीतले वागणे विचित्रच व कीवला परत जाण्याचे काही लक्षण दिसत नव्हते. अखेरीस मी संस्थेला पत्र पाठवून चौकशी केली. तेव्हा त्यांनी कळवले की, "राइसा सोकोलोवा हिने रॅबफॅक्ट संस्था कधीच सोडली. वसतिगृह पण सोडले. आपण कुठे जात आहोत तेही कुणाला कळवलं नाही!"

आता सर्वच गोष्टींचा खुलासा झाला; परंतु मुलांनी राइसाला कधीही चिडवलं नाही. ते बहुधा ही सर्व गोष्ट विसरून गेले असावेत; परंतु एक गोष्ट खरी की, राइसा परत आल्यावर पोरांनी एकातेरीनाची बरेच दिवस या विषयावरून थट्टामस्करी केली. बिचारी एकातेरीना ! एकंदरीत हे सर्व असेच होणार होते याबद्दल त्या पोरांना कल्पना होती.

मार्च महिन्यात मार्कोना ओसीकोवा हिने मला धक्का देणारी बातमी सांगितली, "राइसा बहुधा गरोदर असावी !"

मी तर या बातमीने गारठलोच. एका सुधार संस्थेतली मुलगी गरोदर राहते. आमच्या आजुबाजूच्या परिसरात, तसेच जवळच्या शहरात शिवाय शिक्षणखात्यात अशा सर्व ठिकाणी हे सारे विचित्रच होते. काम करणाऱ्या सोवळ्या लोकांच्या कानांवर ही बातमी गेली तर हाहाकार माजेल. सुधार संस्थेत अशा तऱ्हेचे प्रकार ? छे ! छे ! मुले आणि मुली एकत्र रहातात. माझे तर डोकेच चक्रावून गेले. याचा परिणाम कॉलनीत काय होईल ? अशा वातावरणात राइसाचे कसे होईल अशी मला काळजी पडली. मी मार्कोनाला राइसाच्या मनातले काढून घेण्यासाठी विनंती केली.

आणि काय आश्चर्य ? राइसाने या बातमीचा सपशेल इन्कार केला. उलट असे बोलल्याबद्दल चिडू नये असे दाखवले. 'भलतेसलते आरोप करू नका. असला मूर्खपणा मी करीन तरी कशी ? शिवाय माझ्या शिक्षकांनीच ही बातमी पसरावी हे केवढं दुर्दैव !'

बिचारी मार्कोना ! आपलेच काही चुकले असे तिला वाटू लागले. राइसा मुळातच जाडजूड होती. त्यामुळे तिचे पोट एवढे दिसत नसे. शिवाय दुसरी कोणतीही बाह्यचिन्हं दिसत नव्हती. त्यामुळे आम्हालाही काही जास्त विचार करता येईना. काही दिवस गप्पच बसायचे आम्ही ठरवले.

झादारोवने एक दिवस मला आमच्या मैदानात काही गुप्त खलबत करण्यासाठी बोलावले.

'राइसा गरोदर आहे याची तुम्हाला कल्पना आहे का ?'

'पण तुला कसं हे माहीत ?'

'तुम्ही तरी फारच आहात. तुम्हाला हे दिसत नाही असं का तुम्हाला म्हणायचंय ? सर्वांना ही गोष्ट माहीत आहे, म्हणून तुम्हालाही माहीत आहे असं मी समजतो.'

'समजा, ती गरोदर असली तर पुढं काय ?'

'पुढं काही नाही; पण तिनं आपण गरोदर नसल्याचा बहाणा का म्हणून करावा ? जणू काही झालंच नाही असं ढोंग का करावं ? हे कोर्नेयेवचं पत्र पाहिलंत का ? 'लाडके, ही गोष्ट आपल्याला पूर्वीपासूनच माहीत होती.' इत्यादी, इत्यादी...'

सर्व शिक्षकवर्गातही यामुळे अस्वस्थता निर्माण झाली. मी तर या सगळ्या गोंधळामुळे वैतागून गेलो.

'तुम्हा लोकांना एवढा बाऊ करायला काय झालंय ? समजा, ती गरोदर असली तरी आज किंवा उद्या ती बाळंत होणारच. गरोदरपणा झाकण्याचा जरी तिनं प्रयत्न केला तरी बाळंतपण काही तिला झाकता येणार नाही. यात एवढं संकट कसलं ? आपल्या कॉलनीत एक पोर जन्माला येईल.'

शेवटी एक दिवस मी राइसाला माझ्या ऑफिसात बोलावून घेतले, 'हे बघ राइसा, खरं सांगून टाक. तू गरोदर आहेस का ?'

'तुम्ही सारेजण मला का छळता ? प्रत्येकजण मला टोकतो.'

'तू गरोदर आहेस का ?'

'पण मी तुम्हाला बजावते, मी गरोदर नाही !' असे म्हणून ती रडू लागली.

'हे बघ राइसा,' मी समजावणीच्या सुरात म्हटलं, 'तू गरोदर असलीस तरी त्यात लपवण्यासारखे काहीच नाही. आम्ही सारेजण तुला मदत करू आम्ही तुझ्यासाठी कॉलनीतच काही तरी काम शोधू. तुला पैशाचीही मदत करू. सगळं काही ठीकठाक होईल; पण जन्माला येणाऱ्या पोरासाठी आतापासूनच तयारी नको का करायला?'

'असलं काही करण्याची गरज नाही. मला तुम्ही लोक त्रास देऊ नका व माझ्या वाटेस कोणी जाऊ नका. माझ्याशी कोणी बोलू नका !' असे तिने बजावले.

'ठीक आहे,' असे म्हणून मीही तो विषय तिथेच सोडला. आम्ही कॉलनीतले लोक कुठच्याच निर्णयाला येऊ शकलो नाही. तिला डॉक्टरकडे पाठवणे व तपासून घेणे जरुरीचे आहे असे वाटत होते; पण त्यावर आमच्यात मतभेद होते. कोणी म्हणत, 'अशी तपासणी करून घेणे तरुण मुलींना बरे नव्हे. आज नाही तर उद्या सत्य बाहेर येईल. घाई करण्याची जरुरी नाही. ती गरोदर असलीच तर फार तर पाच महिने झाले असतील. तिला मुकाट राहू द्या. आणखी थोड्या दिवसांनी लपवाछपवी करणं अशक्य होईल.' सध्या राइसाला न दुखविण्याचे आम्ही ठरवले.

१५ एप्रिल रोजी जवळच्या शहरात शिक्षकांची परिषद भरली होती. उद्घाटनाच्या दिवशी मी 'शिस्त' या विषयावर व्याख्यान दिले. माझे व्याख्यान खरे तर पहिल्या अधिवेशनात झाले; पण बऱ्याच लोकांनी काही प्रश्न उपस्थित केले. खूप कडाक्याची चर्चा झाली. ती इतकी लांबली की दुसऱ्या दिवसापर्यंत चालली. माझ्या सर्व सहकाऱ्यांसमवेत ती रात्र आम्ही शहरात परिषदेच्या ठिकाणीच घालवली.

आमच्या कॉलनीची प्रशंसा बऱ्याच दूरवर पसरल्याचे आढळून आले व व्याख्यानाला दुसऱ्या दिवशी प्रचंड गर्दी झाली. अनेक प्रश्नांची चर्चा झाली व मुख्यत्वे 'सहशिक्षणावर माझं मत काय ?' असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला. शासकीय प्रमाणित शाळांतून सहशिक्षणाला कायद्याने बंदी घालण्यात आली होती व आमची कॉलनीच त्याला फक्त अपवाद होती. सबंध देशात हा प्रयोग फक्त आमच्याच कॉलनीत चालू होता.

श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना राइसाचा विचार क्षणभर मनात चमकून गेला. काहीही असले तरी सहशिक्षणाचा व त्याचा तसा काहीच संबंध नव्हता. उलट 'आमच्या कॉलनीत सारी आबादी-आबाद आहे,' असे मी परिषदेला ठासून सांगितले.

मध्यंतराच्या वेळी आम्ही बाहेर बोलत असताना ब्रॅटचिन्को धापा टाकीत आलेला दिसला. त्याला कमालीचा दम लागला होता. इतर शिक्षकांना काहीही सांगायची त्याची तयारी नव्हती.

तो म्हणाला, 'कॉलनीत गडबड झालीय. मुलींच्या डॅरमिटरीत एक मेलेलं मूल सापडलंय. लेनका साफसफाई करीत असताना राइसाच्या सामानात ते सापडलं.'

हे सारे ऐकून आमची स्थिती केविलवाणी झाली. आमच्या स्त्री-शिक्षिका तर रडायलाच लागल्या. त्या सभागृहातून बाहेर पडल्या. मिळेल ते वाहन पकडून त्यांना कॉलनीत पोचवून दिले. अजून प्रश्नोत्तरे संपली नव्हती म्हणून मला थांबावेच लागले.

'ते प्रेत कुठे आहे ?' असे विचारता ब्रावचिन्को म्हणाला, 'इवान-साहेबांनी ते डॉरमिटरीत ठेवून ती बंद करून ठेवली आहे. राइसाला आपल्या कचेरीत बसवून ठेवलीय !'

ब्रावचिन्कोला घाईघाईने रिपोर्ट लिहून दिला व त्याला पोलिस-ठाण्यावर जायला सांगितले. माझे परिषदेचे काम तसेच चालू राहिले.

मी कॉलनीत खूप उशीरा परत गेलो. राइसा लाकडी बाकावर ऑफिसात बसलेली होती तिच्या अंगावर लाँड्रीत काम करीत असतानाचे कपडे होते. मला पाहून तिने अधिकच मान खाली केली. वेर्शनेव तिथेच पुस्तकांच्या कोंडाळ्यात बसून होता. त्याचे कुठेच लक्ष नव्हते. तो पाने उलटीत होता व काही तरी लिहीत होता.

डॉरमिटरीतले ते प्रेत दुसऱ्या खोलीत हलविण्याची मी सूचना दिली. सर्व निजानीज झाल्यावर मी राइसाला विचारण्याचा प्रयत्न केला, 'तू असे का केलेस ?'

तिने माझ्याकडे वर नजर करून एकदाच पाहिले. तिच्या डोळ्यांत कसलेच भाव नव्हते. ती बसल्या जागी तशीच मुकाट्याने बसून राहिली.

'मी जे केलेले आहे ते खरे आहे. यापेक्षा मला जास्त सांगायचे नाही !' एवढेच ती बोलली.

'मी सांगितलेले तू का ऐकले नाहीस ?' असे मी विचारले असता ती रडू लागली व 'मला माहीत नाही,' असे बोलून तशीच बसून राहिली.

मी राइसाला रात्रभर माझ्या ऑफिसातच राहू द्यायचे ठरवले. वेर्शनेव तिथे बसून होता व त्याचे वाचन जोरात चालू होते. तो जागा राहील याबद्दल मला पूर्ण खात्री होती. राइसा आपल्या

जिवाचे काही बरे-वाईट करून घेईल अशी भीती आम्हा साऱ्यांना वाटत होती.

दुसऱ्या दिवशी चौकशीसाठी एक गृहस्थ आले. चौकशीला फारसा वेळ लागला नाही. कारण त्यांना दुसऱ्या कुणाची नाही तर फक्त राइसाचीच जबानी घ्यायची होती. राइसाने सारी जबानी न डगमगता खालीलप्रमाणे दिली.

'रात्री बऱ्याच उशीरा ती प्रसूत झाली. तिच्याबरोबर आणखी पाच मुली तिथे झोपलेल्या होत्या. कोणीही जाग्या झाल्या नाहीत. त्याचे कारण राइसाच्या म्हणण्याप्रमाणे तिने कळा देताना जराही आवाज होऊ दिला नाही. बाळाचा जन्म झाल्याबरोबर तिने त्याला आवळून, शालीत गुंडाळून गुदमरून टाकले. अर्थात् तिने बाळाला प्रथमपासून मारून टाकण्याचे ठरवले नव्हते; पण मूल रडले म्हणून तिने तसे केले, असेही तिने सांगितले. त्यानंतर शालीत गुंडाळलेले प्रेत तिने आपल्या कपडे ठेवायच्या टोपलीत ठेवून दिले. रात्र पडली की, ती टोपली जवळपास झुडुपात टाकून द्यायची. कोल्हे-कुत्रे ते खातील व आपल्या कृत्याची कुणालाही पुसटशी कल्पनाही येणार नाही, असा तिचा कयास होता!'

हे सारे करून ती नेहमीप्रमाणे धोबीघाटावर आपल्या कामावर रुजू झाली. तिने नेहमीप्रमाणे नाश्ता वगैरे केला. तसा कुणाला काही संशय आला नाही. थोड्या मुलांना ती नेहेमीपेक्षा गंभीर वाटली इतकेच.

चौकशी करणाऱ्यांनी ते प्रेत जवळच्या शहरातल्या इस्पितळात पाठवायला सांगितले व राइसाला ते घेऊन गेले.

आमची शिक्षक-मंडळी फारच हबकून गेली. त्यांना वाटले की, कॉलनी यापुढे चालू रहाणे अशक्यच आहे.

मुले मात्र जरा विचित्र मनस्थितीत होती. मुलींना त्या खोलीत झोपायची भीती वाटत असे. कित्येक दिवस झादारोव्ह व काराबानोव हे दोघेही मुलींच्या डॉरमिटरीभोवती गस्त घालीत. त्यामुळे असे झाले की, मुले व मुली कोणीच धडपणे झोपत नसत. त्या दिवसात मुलांचा आवडता व्यवसाय म्हणजे निरनिराळे आवाज काढून वेळी-अवेळी मुलींना घाबरवणे. कधी त्यांच्या खिडकीखाली अंगाला चादरी गुंडाळून घाबरवायचे किंवा खुद्द राइसाच्या रिकाम्या पलंगाखाली लपून बसायचे व रात्री मुलाच्या रडण्याचा आवाज काढायचा.

शिक्षकांच्या दृष्टीने राइसाने स्त्रीसुलभ लज्जेमुळे हे खून करण्याचे धाडस केले असावे. तिची ती शोचनीय परिस्थिती, लहान मुलाचे रडणे व मैत्रिणीपासून आपली परिस्थिती लपवून ठेवण्याची धडपड वगैरे.

पण झादारोव्हने मात्र त्यांच्या या विधानाची चांगलीच टर उडविली. त्याचे म्हणणे असे की, 'काही तरी बडबडू नका. स्त्रीसुलभ लज्जा वगैरे गोष्टी राइसाच्या बाबतीत कधीच नव्हत्या. आपण गरोदर आहोत असे ती शेवटपर्यंत कबूल करीत नव्हती. हे सारे अगदी कोर्नेयेवच्या संमतीने ठरविले होते. तिने जर हे ठरवून केले नसते तर एवढ्या शांतपणे दुसऱ्या दिवशी ती रोजच्या कामावर कशी हजर राहिली? तिने हे कृत्य, सारे बेत व्यवस्थित आखून केलेले होते. मला सत्ता असती तर मी या राइसाला गोळीच घातली असती. ती अगदी क्षुद्र व भ्याड आहे आणि ती तशीच राहील!'

'तुझे म्हणणे खरे धरले तर; असे करण्यात काय हेतू असेल तिचा?'

'हेतू अगदी उघड आहे. तिला व तिच्या त्या ऐदी प्रियकराला मूल नकोच होते. ती सारी जबाबदारी टाळण्याचा हा सोपा उपाय होता तिने तो अंमलात आणला!'

पण शिक्षकांना ते पटेना.

झादारोव्ह परत म्हणाला, 'त्या राइसाला चांगली खडसावली असती तर आणखी कित्येक गोष्टी बाहेर पडल्या असत्या.' साऱ्या मुलांचे याबाबतीत एकमत झाले. 'इतकेच नव्हे तर राइसाची असे करण्याची ही पहिलीच वेळ नसावी. कॉलनीत येण्यापूर्वीसुद्धा तिने असे काही केले असणे शक्य आहे!' असेही ते ठासून म्हणाले.

काराबानोव्हबरोबर मी ते प्रेत शेजारच्या शहरातल्या हॉस्पिटलात पाठविले.

काराबानोव्ह परत आला तो जरा बिथरलेल्या परिस्थितीत. 'अरे बापरे! कसली कसली पोरं त्या इस्पितळात बरण्यात भरून ठेवली आहेत! अतिशय कुरूप, बेढब; पण आपली बेबी त्या सर्वांत खरी सुंदर!'

एकातेरिनाला हे विधान आवडले नाही; पण तिला हसूही लपवता आले नाही. तिने खोटया रागाने त्याला दाटले. बरेच दिवसांनी शिक्षकमंडळींनाही हसताना पाहून मुलांना बरे वाटले, हे आश्चर्य होते.

तीन महिन्यांनंतर राइसाची केस सुनावणीला निघाली. कोर्टात हजर राहायचा हुकूम आला. आम्ही गेलो. मानसशास्त्र व स्त्रीसुलभ लज्जा यांचे कोर्टात चांगले प्रदर्शन झाले. योग्य त्या वळणाची शिस्त मुलांना न लावल्याबद्दल न्यायाधिशांनी आमची कानउघाडणी केली. आम्ही गप्प बसलो. कारण बोलण्यासारखे काही नव्हतेच. मला एकट्यालाच बोलावून न्यायाधिशांनी विचारले, 'तिला परत घेणार का?'

'मी जरूर परत घेणार!' मी उत्तर दिलं.

राइसाला आठ वर्षांच्या देखरेखीखाली ठेवण्याचा हुकूम दिला गेला.

राइसा परत कॉलनीत आली. जणू काही झालेच नाही अशी तिची वृत्ती होती. शहरातून येताना ती नवेकोरे बूट घेऊन आली. बूट घालून ती सारखी मिरवत असे.

एक दिवस नाल्स्या सांगू लागली की, 'राइसाला तुम्ही कॉलनी-बाहेर काढून लावा. तिच्याबरोबर राहणे आम्हाला घृणास्पद वाटते. नाही तर आम्ही साऱ्या जणी मिळून तिला घालवून लावू!'

मी जवळच्या शहरात तिच्यासाठी नोकरी शोधली व तिला एका कपड्याच्या कारखान्यात नोकरीस लावली.

मला ती वारंवार भेटे. १९२८ मध्ये अनेक दिवसांनी ती मला भेटली. एका भोजनगृहात ती काम करीत होती. तिच्यात खूपच फरक झाला होता. ती बरीच लठ्ठ व थोराड दिसू लागली होती. तिच्या शरीराचा आकार बदलत गेला होता.

'तुझं कसं चाललंय?' असे मी विचारताच तिने हसून व समाधानाने 'ठीक चाललंय,' असे सांगितले, 'मला दोन मुलं आहेत व माझा नवराही फार चांगला आहे.'

'कोर्नेयेवबद्दल बोलतेस का ?'

'नाही आन्तोन, ते केव्हाच संपलं. कोर्नेयेवचा कुठं तरी खून झाला. मला तुम्ही खूप मदत केलीत व माझ्यासाठी खूप त्रास सोसलात. मला तुम्ही कारखान्यात नोकरीला लावलं, त्याच दिवशी मी माझं पूर्वायुष्य सोडलं. आपण मला चांगल्या मार्गावर आणून सोडलंत याबद्दल मी तुमची फार फार आभारी आहे!' ▫

## प्रकरण सोळावे

# गबर सूप

वसंत ऋतूत आम्हाला एका नवीनच आपत्तीला तोंड लागले. आमचा कोस्त्या एकाएकी भयंकर आजारी झाला.

एकातेरीना पूर्वी मेडिकल कॉलेजात होती व तिचे ते तुटपुंजे ज्ञान आम्हाला उपयोगी पडत असे. आमच्या कॉलनीत मोठ्या आजारीपणाचे फारसे प्रसंग उद्भवले नव्हते. मुलांना कुठे खरचटणे किंवा खोक पडणे यापलीकडे फारसे काही होत नसे. हिवाळ्यात फार तर पायतण नसल्यामुळे पाय फुटणे वगैरे त्रास होई; पण एकातेरीना ते सारे सांभाळून घेई. डॉक्टरकडे जाण्याची आमच्यावर पाळी आली नव्हती.

माझ्या मुलांचा याबाबतीत मला अभिमान वाटे. त्यांना डॉक्टर व औषध यांचे वावडेच होते. थोडाबहुत ताप असला तरी तो खुशाल अंगावर काढायचा व आपल्या सहनशक्तीचे चांगले प्रदर्शन करायचे असा आमचा खाक्या होता; पण त्याचे खरे इंगित असे होते की, डॉक्टर आमच्या कॉलनीत यायला कुरकुर करीत असत.

कोस्त्या आजारी पडला तेव्हा आम्हाला त्याचे फारसे काही वाटले नाही; पण त्याचा ताप चढू लागला तेव्हा मात्र आम्ही जरा घाबरलो. हा अनुभव आम्हाला नवाच होता. त्याला अगदी निजवून ठेवला होता. जे जे उपाय करता येतील ते ते करण्याचा प्रयत्न केला आम्ही. संध्याकाळी त्याची मित्रमंडळी त्यांच्या पलंगाभोवती जमत. कारण कोस्त्या सर्व मुलांच्यात फार लोकप्रिय होता. कोस्त्याला एकटे एकटे वाटू नये व मुलांनाही दुखवू नये म्हणून आम्हीसुद्धा सारीजणे अधूनमधून त्याच्या बिछान्याजवळ बसत असू.

तीन दिवसांनी ताप खाली येईना तेव्हा एकातेरिना म्हणाली, 'मला वाटतं हा विषमज्वर असावा!' लगेच आम्ही मुलांना त्याच्याजवळ जाण्याची मनाई केली; पण त्याला सपशेल वेगळा ठेवणे शक्यच नव्हते. डॉरमिटरीचाच बसण्या-उठण्यासाठी व झोपण्यासाठी उपयोग आम्हाला करावे लागे. कारण आमच्याकडे दुसरी जागाच नव्हती.

चौथ्या दिवशी त्याला एका रजईत गुडाळून मी स्वतः जवळच्या शहरातल्या इस्पितळाचा रस्ता पकडला.

हॉस्पिटलच्या वेटिंग रूममध्ये जवळजवळ ४० रोगी कण्हत कुंथत डॉक्टरच्या येण्याची वाट पहात बसले होते. इस्पितळाचे कर्मचारी बहुधा रोग्यांच्या मानाने फार कमी पडत असावे व त्यामुळे त्यांना कामाचा खूपच ताण पडत असावा. त्यांच्या थकलेल्या चेहऱ्यांवरून त्यांच्या हातून रोग्याला फारसा आराम मिळेल अशी अपेक्षा करणे चुकीचेच होते. बऱ्याच वेळाने डॉक्टरांची स्वारी आली. त्याने कोस्त्याचे कपडे बाजूला करून पाहिले व आपल्या हाताखालील माणसाला सूचना दिली की, 'विषमज्वराचा रोगी आहे याला त्या वॉर्डात पाठवून द्या!'

एका शहराच्या बाहेरच्या मैदानात युद्धानंतर मोकळ्या पडलेल्या लहान-मोठ्या बऱ्याच झोपड्या होत्या. मी, वरील रोगी, वॉर्डबॉय यांच्या घोळक्यात इकडून तिकडे फिरलो. आमचा रोगी हाताखालच्या डॉक्टरने भरती करून घ्यावयाचा असे सांगण्यात आले होते; परंतु तो डॉक्टर कुठे असेल हे कोणीच सांगू शकत नव्हते. मी रागारागाने बडबडतो, 'शी! काय हा बेजबाबदारपणा!' माझ्या उद्गाराचा परिणाम झाला व कोस्त्याला त्यांनी पट्कन कपडे बदलून योग्य त्या झोपडीत नेऊन ठेवला.

मी कॉलनीत परत आलो तो आणखी काहीजण तापाने पछाडलेले आढळून आले. झादारोव्ह, असादची वगैरे पोरे हैराण झाली होती. झादारोव्ह तसाच फिरत होता व एकातेरीनाबरोबर वादविवाद करीत होता. ती त्याला जाऊन झोपावयास सांगत होती.

'काय झालंय एवढं, उगाचच झोपायला सांगता ते? मी लोहारखान्यात जातो. तो साफ्रोन मला लवकर बरा करील!'

'वेड्यासारखं काही तरी बडबडू नकोस. साफ्रोन तुला कसा बरा करील?'

'तो स्वतः कसा बरा होतो माहीत आहे? वोदका, मिरे, मीठ, कापूर व गाडीचं वंगण एकत्र करून घ्यायचं. यानं लवकर बरं वाटतं.' असे म्हणून तो स्वतःचे नेहमीचे दिलखुलास हसू हसला.

'आन्तोन, तुम्ही या पोरांना फार लाडावून ठेवलंय.' एकातेरीना म्हणाली, 'म्हणे साफ्रोन मला औषध देईल. मुकाट्यानं जाऊन झोप पाहू. याला तुम्ही तुमच्यावरोबर घेऊन जा आणि झोपायला लावा!'

झादारोव्हला उभे रहाणे अशक्यच होते एवढा त्याला ताप चढला होता. मी त्याला धरून डॉरमिटरीत नेले व झोपवले. असादची व बेलुखिन झोपले होते. एकंदरीत इतर वेळी बेडर वाटणारी ही मुले आजारी पडल्यावर फार धिंगाणा घालतात असा अनुभव आहे. असादची मोठमोठ्याने कण्हत होता व बेलुखिन मुकाट्याने पडून होता; पण नेहमीप्रमाणेच त्याचा विनोद चालू होता.

बेलुखिन हा आमच्या कॉलनीतला सर्वात विनोदी मुलगा होता. तो खरोखर एका कामगाराचा मुलगा होता. दुष्काळाच्या दिवसात खायला शोधीत तो त्याच्या घरातून निघाला. मॉस्कोत केव्हा पोचला माहीत नाही. तिथं त्याला पोलिसांनी पकडून बालसुधारगृहात टाकले. तिथून तो पळाला व परत रस्त्यावर फिरू लागला. परत पकडला गेला व परत तो निसटला. तसा तो मूळचा हरहुन्नरी असल्याने चोरी करण्यापेक्षा सट्टा खेळणे त्याने पसंत केले; परंतु नंतर या फसलेल्या कर्तृत्वाचे वर्णन करताना तो अगदी मोकळेपणाने हसत असे. शेवटी आपल्याच्याने ते जमणार नाही याची खात्री झाल्यावर तो युक्रेनला गेला.

बेलुखिनला थोडे-बहुत शाळेचे शिक्षण मिळाले होते. त्याला सारी थोडी थोडी माहिती होती; पण तरीही तो तसा हुषार म्हणता आला नसता. त्याला गणित, भाषा व इतर विषयांची माहिती होती; पण त्याचा उपयोग तो बरोबर करीत नव्हता. त्याचे बोलणेही तसे विचित्रच. त्यात एकसूत्रीपणा नव्हता; पण तरीही तो चलाख होता.

एवढा तापाने फणफणत असूनही त्याची विनोदबुद्धी जागी होती.

'काय बुवा हा विषमज्वर ! यानं आमच्यासारख्या कामगारांना कशाला धरावं ? उद्या समाजवाद आला की या असल्या गोष्टींना आम्ही थारा देणार नाही. समजा, रेशनकार्ड किंवा दुसऱ्या काही कारणासाठी ते आलेच तर आम्ही त्यांना आमच्या सेक्रेटरीकडे सोपवू, कारण त्यांनाही जगायचा व रहायचा हक्क आहेच. कोल्या वेर्शव आमचा सेक्रेटरी. कारण तो गोचडी कुत्र्याला चिकटतात, त्याप्रमाणे अगदी पुस्तकाला चिकटून राहतो. तो माशा, जंतू या सगळयांचा समाचार घेईल. कारण लोकशाहीत त्याच्या वैद्यकीय दृष्टीला सगळं सारखंच ना !'

'समाजसत्तावादात मी चिटणीस व तू कोण रहाशील, जरा सांगशील का ?' कोल्याने विचारले.

कोल्या बेलुखिनच्या पलंगावर पायांजवळ बसला होता. तो नेहमीप्रमाणेच अस्ताव्यस्त अवस्थेत होता व त्याच्या हातात पुस्तक होते.

बेलुखिन म्हणाला, 'अरे, मी ना ? मी कायदेपंडित होईन आणि प्रथम कायदे करीन की, माणसांनी नीट कपडे घालावेत म्हणजे ती माणसंच दिसतील. तू एवढा बावळट कसा रे ? तुझ्यापेक्षा तरी तो डांबरविक्या बरा. खरं की नाही तोस्का ?'

वेर्शनेवकडे बघून सारीजणं हसली; पण तो जराही चिडला नाही. उलट बेलुखिनकडे त्याने एक प्रेमळ कटाक्ष टाकला. दोघेही खरे दोस्त होते. दोघेही कॉलनीत बरोबर आले होते व सतत लोहारखात्यात बरोबर काम करीत असत. फरक एवढाच की, कोल्या तिथेही एका हातात पुस्तक घेऊन वाचण्याचे काम चालू ठेवीत असे. बेलुखिन ऐरणीवर काम करीत असे.

तोस्का सकोलोव याचे व माझे टोपणनाव सारखे होते. तो सरासरी १० वर्षाचा होता. अगदी बेशुद्धावस्थेत बेलुखिनने जवळच्या झुडपातून त्याला कॉलनीत उचलून आणला होता. तोस्का मूळचा समारा प्रांतातला. आई-वडिलांबरोबर युक्रेनला आला. त्याची आई वाटेतच वारली व त्यानंतर तोस्काला काहीच आठवत नव्हते. त्याचा चेहरा तसा नितळ व बालिश होता. बेलुखिनवर त्याची भक्ती होती. तोस्काने तसे फारच थोडे जग पाहिले होते. बेलुखिनच्या धाडसी व विनोदप्रिय स्वभावावर तो बेहद्द खूष होता व त्यालाच तो चिकटून रहात असे.

तोस्का या वेळी बेलुखिनच्या खाटेजवळ उभा होता व प्रेमादराने त्याच्याकडे बघत होता. बेलुखिनची कोटी त्याला फार आवडली. हसता हसता तो 'काळं माकड' असे म्हणून परत मोठ्याने हसला.

'तोस्का तसा छान तयार होईल हं !' बेलुखिन म्हणाला. तोस्काला समजेचना. तो बेलुखिनकडे पहात राहिला. बेलुखिन परत त्याला म्हणाला, 'कोल्यासारखा तू सतत वाचीत बसू नको हं. तो एक वेडा आहे तेवढा पुरे !'

'अरे, तो पुस्तकं वाचीत नाही. पुस्तकंच त्याला वाचतात.' पलीकडच्या खाटेवरून झादारोव बोलला.

मी व काराबानोव पलीकडे बसून बुद्धिबळं खेळत होतो. मी मनात म्हटले, यांना विषमज्वर झालाय हे ही पोरं विसरलेली दिसतात. मी म्हटले, 'कोणी तरी एकातेरीनाला बोलवा पाहू '

एकातेरीनाने खोलीत प्रवेश केला तर ती जरा रागातच होती. 'हा काय तुमचा भलताच हळवेपणा. हे काय तोस्का ? तू काय करतोस इथं ? चल नीघ पाहू आणि तुम्ही सारीजणं इथं कशाला ?'

तोस्का घाबरून मागच्यामागे पळाला. काराबानेने त्याचा हात पकडला व बाहेर जाता जाता म्हणाला, 'खरंच, मलासुद्धा भीती वाटतेय.'

झादारोव्ह म्हणाला, 'तोस्का, आन्तोन सरांचा पण हात धरून त्यांना बाहेर ने. त्यांना तरी कशाला इथं बसू द्यायचं ?'

बिचारी एकातेरिना सगळयांच्याकडे आळीपाळीने पहात राहिली. 'तुम्ही सारेजण झुलू आहात. खरोखर !'

'झुलू म्हणजे कपडे न घालता फिरणारे व आपल्याच सहकाऱ्यांचा फडशा पाडणारे तेच ना ? किंवा एखाद्या तरुणीला सोबत करतो असे म्हणतात आणि तीही आनंदाने 'नको हो. कशाला ? कशाला ? मी एकटी जाईन', असे म्हणते. त्यावर 'तसं चालणार नाही', असं म्हणून तिला एका कोपऱ्यात नेऊन तिचा फडशा पाडतात तेच ना ?' बेलुखिन म्हणाला.

तोस्काचे हसू ऐकायला आले व एकातेरीनालासुद्धा हसू आवरणं अशक्य झाले. 'झुलू तरुणींना खात असतील; पण तुम्ही छोटचा मुलांना विषमज्वराच्या रोग्याजवळ बसू देता तेही तितकंच वाईट.'

वेर्शनेवने या संधीचा फायदा घेऊन बेलुखिनला खिजवले, 'झुलू तरुणींना खात नाहीत हं. तुझ्यापेक्षा जास्त अक्कलवान पण असतात. खरंच, तू तुझं आजारपण बहुधा त्या तोस्काला देणार.'

एकातेरिना वेर्शनेवला म्हणाली, 'पण महाशय, तुम्ही फार शहाणे, त्या खाटेवर कशाला बसलात ? उठा पाहू तिथून.'

वेर्शनेव जरा बिचकला व गडबडीने बेलुखिनच्या बिछान्यावर पसरलेली पुस्तके गोळा करीत उठला. झादारोवने त्याला चिमटा काढला, 'वेर्शनेव काही तरुणी नाही, शिवाय बेलुखिन काही त्याला खाणार नाही !'

एकातेरिनाच्यामागे उभा असलेला तोस्का गंभीरपणाने म्हणाला, 'आमच्या माटवई काळया माकडाला खाणार नाही हं !'

वेर्शनेव आपली सारी पुस्तके एका हातात धरून व दुसऱ्या हाताने तोस्काला पकडून आपल्या खाटेकडे गेला व सारीजणंच उठून गेली.

दुसऱ्या दिवशी आम्ही बनविलेल्या गाडीतून कॉलनीतल्या सगळ्या रोग्यांना भरून मी व ब्राटचिन्को हॉस्पिटलला जायला निघालो. 'पुन्हा एकदा मागच्या सर्व प्रकारची उजळणी होणार असं मला वाटलं. शिवाय ही माझी मुलं बरी होऊन परत येतील ना, या विचाराने माझे मन खट्टू झाले.

असादची गाडीत दुलई लपेटून झोपला होता. त्याचे बूड अगदी खराब व बरेच जुनाट झाले होते. बेलुखिनने आपली दुबई खांद्या-

वरून डोक्यावर सरकवली. त्याचा विनोद चालूच होता. तो म्हणाला, 'लोकांना वाटेल की, आम्ही सगळे पाद्री आहोत व एवढे हे पाद्री चालले तरी कोठे, असे ते म्हणतील.'

झादारोव फक्त क्षीणपणे हसला. त्याच्या हसण्यावरून त्याला किती यातना होत होत्या हे स्पष्ट दिसत होते.

विषमज्वराच्या त्या वॉर्डाकडे सर्व काही तसेच होते. मागाच्या वेळी भेटलेली परिचारिका मला परत भेटली. मी तिला विचारले, 'वेल्कोस्की कसा आहे ?'

'अजून काही सांगता येत नाही,' असे रागारागाने ती म्हणाली. ब्राटचिन्कोने तिच्या मागे वेडावून दाखविले, 'म्हणे काही सांगता येत नाही. वा ! छान !!'

यावर ब्राटचिन्कोकडे पाहून तिने जरा कुर्यातच विचारले, 'हा मुलगा तुमच्याबरोबरचा आहे का ?' ब्राटचिन्कोचा अवतार तसाच होता. त्याच्या अंगाला गोठ्याचा वास येत होता. कपड्यांना गवताच्या काड्या चिकटलेल्या होत्या.

मी जरा नरमाईने बोललो, 'आम्ही गॉर्की कॉलनीचे आहोत. आमचा एक मुलगा आधीच इथं दाखल केला आहे व मी आज आणखी तिघांना घेऊन आलोय. तेही विषमज्वराचे रोगी असावेत !'

'त्यांना घेऊन तुम्ही वेटिंग रूममध्ये थांबा !'

'अहो, पण तिथं एवढी गर्दी आहे. शिवाय माझी चारी मुलं एकत्र असावीत अशी माझी इच्छा आहे.'

'असे सगळ्यांचे चोचले पुरवायला आम्हाला वेळ नाही,' असे बोलून ती जाण्यासाठी वळली. ब्राटचिन्कोनं तिचा रस्ता रोखला. तो म्हणाला, 'अहो, जरा नीट बोलाल का नाही ? तुम्हाला एवढं रागवायला काय झालंय ?'

'मंडळी, तुम्हाला वेटिंग रूमलाच जावं लागेल हं ! माझा आणखी वेळ घेऊ नका !'

मी व ती परिचारिका ब्राटचिन्कोवर उखडलो. मी रागाने त्याला चालता हो, असे म्हटले. 'तुला मध्ये बोलायला कोणी सांगितलं ?'

पण तो कसला मख्ख ! तिथेच मी व ती परिचारिका यांच्याकडे आळीपाळीने पहात उभा राहिला.

मी त्या बाईशी परत बोलण्याचा प्रयत्न केला, 'जरा ऐकून तर घ्या. माझी ही पोरं लवकर बरी व्हावीत अशी माझी इच्छा आहे. माझ्या प्रत्येक मुलामागे मी दोन पौंड आटा देईन ! माझा एक जिथे आहे तिथेच या तिघांना कृपा करून पाठवा, म्हणजे मला पण बरे पडेल !'

आटा देण्याची गोष्ट ऐकून ती परिचारिका चिडली. 'मला काय लाच देता होय ! कोण समजता तुम्ही मला ?'

'अहो, ही लाच नव्हे. असा गैरसमज करून घेऊ नका. खरं तर हे तुमच्या चांगल्या कामगिरीबद्दल खास पारितोषिक आहे. तुम्ही करणार नसला तर मी दुसऱ्या कुणाला तरी सांगेन! हे पहा, आमची मुलं ही मुळातच फारशी धडधाकट नाहीत. तेव्हा त्यांची जरा जास्त काळजी घ्यावी लागेल आणि त्याचाच अर्थ असा की, तुम्हाला जास्त काम करावं लागेल. या मुलांना उभ्या जगात नात्यागोत्याचं कोणी नाही !'

'बरं आहे महाशय. मी माझ्या वॉर्डमध्ये त्यांना नेते. एकूण कितीजण आहेत, सांगा पाहू; पण मला तुमचं ते खास बक्षीस वगैरे काही नको आहे.'

'आत्ता मी तिघांना घेऊन आलेलो आहे. पण...' 'ठीक आहे. ठीक आहे. माझ्याबरोबर चला पाहू !'

मी व ब्राटचिन्को त्यांच्याबरोबर वॉर्डकडे चालू लागलो. जाता जाता ब्राटचिन्कोने परिचारिकेकडे पाहून इशारा केला. मी त्याला खुणेने गप्प बसण्यास सांगितले. ती परिचारिका आम्हाला तिच्या वॉर्डमध्ये घेऊन गेली आणि ब्राटचिन्को आम्ही आणलेल्या मुलांना आणण्यास गेला. वॉर्डकडे जाताना एकजण म्हणाला, 'बिचारे विषमज्वरानं आजारी दिसतात !'

'ही सारी मुलं गॉर्की कॉलनीतली आहेत.' असे परिचारिकेने सांगितले. ती पुढे म्हणाली, 'परंतु तुमच्या रहाण्याची काय सोय आहे ?'

'पण तुमच्याकडं खरोखरीच जागा आहे काय ?'

'जागा आहे हो माझ्याकडे; शिवाय दोन रोगी आजच घरी जात आहेत.'

बेलुखिनने त्याच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे एक कोटी केलीच, 'आन्तोन, आणखीन काहीजणांना तुम्ही जरूर पाठवून द्या. तेवढीच वॉर्डमध्ये आम्हाला थंडी कमी वाजेल !'

बेलुखिनची इच्छा खरोखरीच येत्या दोन दिवसांत पुरी झाली. आम्ही आणखी गोलस, श्वेनायवर या दोघांना आणले आणि आणखी एका आठवड्याने आणखी तिघांना आणले. सुदैवाने ही भरती एकदाची थांबली.

ब्राटचिन्को वरचेवर इस्पितळात जाऊन खबर आणी.

आम्ही बऱ्या झालेल्या मुलांना इस्पितळातून आणण्याचा विचार करीत होतो. वसंत ऋतूची नुकतीच सुरुवात झाली होती. एके दिवशी गोधडीत लपेटून आमच्याच बाजूने एक व्यक्ती येताना दिसली. ती तडक आमच्या लोहारखात्याकडे वळली. त्याने एकदम, 'अहो लोहार-दादा !' अशी आरोळी ठोकली. 'काय चाललंय ? अजूनही तुम्ही वाचतीच बसला आहात ? तुमच्या तब्येतीची तुम्ही काळजी घ्या बरं !'

पोरांनी बेलुखिन, बेलुखिन असा एकच गिल्ला केला. मुलांना त्यांचा जुना सोबती मिळाल्याचा फारच आनंद झाला.

एकातेरीना हा सर्व प्रकार पाहून बेलुखिनवर उसळली. 'तुला पायी चालत यायला कोणी सांगितलं होतं ! सांग पाहू !'

यावर बेलुखिन बोलला, 'हे पहा एकातेरिनाबाई, मी खूप वेळ थांबलो असतो; पण खरं सांगू, मला आपल्या कॉलनीतल्या जेवणाची ओढ लागली होती. हॉस्पिटमधील रायची रोटी व त्याच्याबरोबरचं ते फर्मासी कालवण फुकटचं मिळत होतं. त्यामुळंच ते अगदी कमा-लीचं नकोसं झालं होतं आणि म्हणून मी तिथून काढता पाय घेतला ! समजलं ?'

त्याचे बोलणे आणि हसणे दोन्हीही चालूच होते.

'फर्मासी कालवण कसलं रे ?'

'सांगतो हं. गोगोलनं एका पत्रात लिहिलं होतं. पण त्यानं त्याची भलतीच स्तुती केली होती आणि ते हॉस्पिटलमधले लोक ते फर्मासी कालवण आग्रह करकरून वाढीत. पण मला मात्र ते खायला बसलो

की, ते खाण्याऐवजी हसण्याच्या उकळ्या येत. काय सांगू ? तरी परिचारिका माझ्यावर एवढी चिडायची, मग मी जास्तच हसायचो. म्हणून शेवटी निश्चय करून निघून आलो !'

'अरे, पण तुमची जेवणं झाली आहेत की नाही ?'

'आज आपल्याकडं काही तरी छान छान असेल ना ?'

एकातेरीनाने त्याच्यासाठी कुठून तरी दूध आणले.

'आज छान छान काही आजारी माणसांनी खायचं नाही !'

बेलुखिनने दूध घेऊन तिचे आभार मानले; परंतु त्यातले थोडे दूधसुद्धा हसता हसता सांडले.

एकातेरीनाने त्याच्या नादी लागायचे सोडून दिले.

लवकरच सारेजण इस्पितळातून सुखरूप परत आले आणि ब्राटचिन्कोने ठरल्याप्रमाणे एक गोणीभर गव्हाचा आटा त्या परिचारिकेच्या घरी पोचता केला. □

## प्रकरण सतरावे

# शारीनचा विरोध

राइसाचे मूल, विषमज्वराची साथ, तसेच थंडी, मुलांच्या पायांना होणारा थंडीचा भयंकर त्रास, जळाऊ लाकडांची चणचण या सगळ्या आपत्ती आम्ही हळूहळू विसरलो; परंतु आमचे शिक्षणखाते मला क्षमा करण्यास तयार नव्हते. माझ्या शिक्षणतंत्राला ते हुकूमशाही कारभार म्हणत असत.

मला ते नेहमी बजावीत, 'आम्ही तुझं हे पोलिसी तंत्र बदलून टाकणार आहोत.' त्यांच्या मते समाजसत्तावादात शिक्षणाला पण लोकशाही तंत्रच वापरले पाहिजे. माझे तंत्र म्हणजे शुद्ध दडपशाहीच होती असे त्यांचे मत होते.

परिषदेतल्या माझ्या 'शिस्त' या विषयावर दिलेल्या व्याख्यानात शिस्त वगैरेसारख्या मूलभूत गोष्टींबद्दल प्रश्न उपस्थित करण्याचे धाडस मी केले होते. त्या काळच्या प्रचलित शिक्षणपद्धतीमध्ये शिक्षा करणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा ऱ्हास करणे. याउलट त्यांना जास्तीत जास्त मोकळीक देणे म्हणजेच त्यांच्यातल्या सुप्त क्रियाशक्तींना व त्यांच्या स्वयंसंघटित शिस्तीला जास्तीत जास्त वाव देणे असा समज होता. मी असा आग्रह धरला की, 'जोपर्यंत आपला सामुदायिक जीवनाचा पाया व रीतीभाती अस्तित्वात येत नाहीत, काम करण्याच्या व संस्कृतीच्या काही पद्धती अस्तित्वात येत नाहीत, तोपर्यंत विद्यार्थ्यांवर काही गोष्टी जबरदस्तीने लादल्या जाणे यात काहीही वावगे नाही आणि माझा असा विश्वास आहे की, मुलांच्या आवडीनुसार शिक्षण सोपवून देणे अशक्य आहे. कारण कामाविषयी आस्था व शिस्त या दोन्ही गोष्टी पहिल्या गोष्टीच्या– आवडीनुसार शिक्षण–बरोबर विरुद्ध पडतात. आपल्या समाजसत्तावादाला बळकटी आणण्यासाठी आपले शिक्षणतंत्र असे पाहिजे की, सामुदायिक तत्त्वावर भर देऊन त्यायोगे सुबुद्ध व धडधाकट माणसे तयार झाली पाहिजेत.'

मी व्याख्यानात शेवटी आपल्याला अतिशय भक्कम उत्साही व चारित्र्यपूर्ण सामुदायिक तयार करायचे आहे आणि सामुदायिकावरच आपल्याला भिस्त ठेवली पाहिजे, यावर भर दिला. परंतु माझे विरोधक माझ्या तोंडावर शिक्षणतंत्रातल्या ठोकळेबाज गोष्टी व तोडगे सद्‌गदित आवाजात मांडीत.

त्या परिषदेनंतर कॉलनी बरखास्त करून टाकावी असा अनेकदा माझ्या मनात विचार आला; परंतु आमच्या रोजच्या गरजा, निरनिराळे प्रश्न, पेरणी आणि कधीही न संपणारी त्या इमारतीची दुरुस्ती या सगळ्यामध्ये मी अगदी बुडून गेलो होतो आणि त्यामुळे शिक्षणखात्याच्या रोजच्या कटकटींच्याकडे मी संपूर्ण दुर्लक्ष केले.

परंतु माझी बाजू घेणारा कोणी तरी खास त्या खात्यात असावा, नाही तर यापूर्वीच मला व कॉलनीला त्यांनी खलास करून टाकले असते किंवा माझी बदली करणेही त्यांना काही कठीण नव्हते.

मी शिक्षणखात्याच्या कचेरीत जाणे टाळीत असे. तिथे गेल्यानंतर ते माझ्याशी साध्या औपचारिकपणानेसुद्धा वागत नसत. तिथे एक शारीन नावाचे गृहस्थ होते. दिसायला अत्यंत रुबाबदार. दाट कुरळे केस. एकंदर स्त्रियांच्या मनात चटकन भरण्याजोगे असे होते. त्यांचे ओठ लालसर, जाड आणि भुवया अगदी कमानदार होत्या. १९१७ च्या क्रांतीपूर्वी हे कोण होते हे कोणालाच माहीत नाही; परंतु आता मात्र समाजशिक्षणतज्ज्ञ समजले जात असत. त्यांनी शिक्षणतंत्रातले अद्यावत वाक्प्रचार आत्मसात केले होते आणि ते खुमासदार भाषा वापरीत असत. याच गोष्टीची शिक्षणतंत्रातील क्रांतीला जरुरी असते असा त्यांचा विश्वास होता.

सुरवातीपासूनच त्यांना माझ्याबद्दल अतिशय दुस्वास वाटत असावा आणि ते तो आपल्या वर्तणुकीत दर्शवीतही असत. एकदा त्यांच्या या विक्षिप्तपणाला मी खूप हसलो होतो.

हे गृहस्थ एक दिवस कॉलनीत आले. आले ते सरळ माझ्या ऑफिसात. त्यांची नजर माझ्या टेबलावर पडलेल्या वस्तूवर गेली. त्यांनी विचारले,

'हे काय आहे हो ?'

'हे होय ? याला वायुभारमापक म्हणतात.'

'वायुभारमापक म्हणजे काय ?'

'वायुभारमापक म्हणजे हवामानातील फेरबदल सांगणारी वस्तू.' मला त्यांचे जरा आश्चर्य वाटले. यावर ते म्हणाले, 'अहो, हवा तर खोलीच्या बाहेर आहे आणि ही नळी तर तुम्ही खोलीच्या आत ठेवलीत. तेव्हा तुम्ही हवा मोजणार कशी ?'

त्याच वेळी मी अतिशय मोठ्याने हसलो. मी हसू दाबायचा जराही प्रयत्न केला नाही. शारीनसाहेबांनी विद्वत्तेचा व हुषारीचा आव आणला नसता तर मी कदाचित् एवढ्या मोठ्यांदा हसलो नसतो.

शारीनसाहेब भलतेच चिडले. 'तुम्हाला एवढं हसायला काय झालं ?' त्यांनी मला विचारले, 'तुम्ही स्वतःला शिक्षणतज्ज्ञ म्हणवता. मला जर एखादी गोष्ट समजली नाही तर ती समजावून सांगणं तुमचं कर्तव्य आहे ! अशाच तऱ्हेनं तुमच्या मुलांना तुम्ही शिकवता का ?'

मला हसू आवरतच नव्हते. मी एक गोष्ट ऐकली होती तिची मला आठवण झाली. योगायोगाने ती गोष्ट व शारीनचा तो वायुभारमापकाबद्दलचा प्रश्न तंतोतंत जुळले. असे प्रश्न विचारणारे लोक फक्त गोष्टीतच नव्हेत, तर प्रत्यक्ष आयुष्यातही भेटतात तर ! तेही जिल्हापरिषदेतील शिक्षणखात्याच्या एका तपासनिसाकडून.

शारीनसाहेब रागारागाने निघून गेले. माझ्या 'शिस्त' या विषयावरील व्याख्यानावर शारीनसाहेबांनी टीकेची झोड उठवली. ते खूपसे मोठमोठ्या शब्दांत बरचसे काय बोलले ते त्यांचे त्यांनाच उमजले असेल.

'वैद्यकीय शिक्षणशास्त्राची स्थानीय पद्धत व तिचा मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर पडणारा प्रभाव, तसेच समाजशिक्षणाची संघटना यांना काही प्रमाणापर्यंत दिले जाणारे प्राधान्य मुलांच्या स्वाभाविक गरजा पुऱ्या करण्यास आणि काही प्रमाणात त्यांना क्रियाशील बनवण्यात दिलेल्या आराखड्याप्रमाणे मदत करतील. उदा. जीवनशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी...'

याच शारीनसाहेबांनी १९२२ च्या वसंत ऋतूत मला गंडवायचा प्रयत्न केला होता. राखीव फौजेच्या खात्याकडून एक मुलगा कॉलनीत भरती करायला पाठविला होता. मी त्याला ठेवूनही घेतला. दोन दिवसांनी शारिनसाहेबांनी मला विचारणा केली की, 'आमच्या खात्याच्या परवानगीशिवाय त्या मुलाला तुम्ही का ठेवून घेतलंत ?'

'राखीव खात्यानं त्याला पाठवलं म्हणून ठेवून घेतलं !' मी त्याला सांगितले.

त्यावर शारीनसाहेब आणखीनच गरम झाले. 'आमच्या परवानगीवाचून तुम्ही कोणालाही घ्यायचं नाही!'

'तुम्ही व राखीव खातं आपापसात तडजोड करा. मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही !'

'मी तुमचा वरचा अधिकारी आहे. मी हुकूम देतो की त्याला ताबडतोब परत पाठवा !'

'तुम्ही लेखी लिहून द्या' असे सुचविताच शारीनसाहेबांचे पित्त खवळले. ते म्हणाले,

'मी तोंडीच हुकूम करतो व तो तुम्हाला पाळायला पाहिजे ! पाळणार नसाल तर मी तुम्हाला येथेच अटक करतो !'

मला कुठून तरी अडचणीत टाकायला हा गृहस्थ संधीच शोधत होता हे तेव्हा स्पष्ट झाले – 'ठीक आहे. होऊन जाऊ दे !'

शारीनना काय वाटले कोणास ठाऊक. परत एकदा त्यांनी 'त्या मुलाला परत पाठवा !' असे मला म्हटले. अर्थातच मीही 'लेखी हुकमाशिवाय ते होणं नाही,' असे ठासून सांगितले व पुढे म्हटले, 'तसं नसेल तर खुशाल मला अटक करा ! शिक्षणखात्याकडून मला शिक्षा झाली तर ते जास्त वरं दिसेल !'

'तर मग तुम्हाला अटक केली आहे,' असे म्हणून त्यांनी पोलिसखात्याला घेऊन जाण्यासाठी माणूस पाठवा, असा टेलिफोनवर निरोप सांगितला.

'पोलिस येईपर्यंत मी माझ्या कॉलनीचं सामान घेऊन पाठवून देतो,' असे त्यांना सुचविले; पण त्यांनी सांगितले, – 'ते काही नाही. तुम्ही येथून हलायचं नाही !'

तो गेल्यावर मी फोन उचलला व शिक्षणखात्याच्या चेअरमनला फोन केला. त्याने सारे ऐकून घेतले व मला सांगितले, 'धडपड नकोस ! मुकाट्यानं घरी जा किंवा पोलीस येईपर्यंत थांब व त्याला मला फोन करायला सांग !'

थोड्याच वेळात पोलीस आला. मी त्याला शिक्षणखात्याला फोन करायला सांगितले; पण त्याने, 'ते आपलं काम नव्हे', असे म्हणून नाकारले.

बाहेर पडल्यावर पोलिसाबरोबर मला पाहून ब्रॅटचिन्को घाबरला. त्याला तिथेच थांबायला सांगून मी हेडक्वार्टर्सकडे गेलो. साधारण चार वाजता माझी सुटका झाली.

परत जाताना आमची गाडी आम्ही खरेदी केलेल्या वस्तू भरून चालवली होती. मी व ब्रॅटचिन्को एकमेकांशी आपसात न बोलताच रेंगाळत चाललो होतो. दोघेही आपल्याच विचारात गढून गेलो होतो. माझ्यावर नुकत्याच झालेल्या अन्यायाचा व कदाचित त्याचे घोडे व त्यांचे खाणे यासंबंधी अनुक्रमे मी व ब्रॅटचिन्को विचार करीत होतो.

मोठा रस्ता सोडून आम्ही कॉलनीच्या रस्त्याला लागलो. आमची लॅंडी एकदम खिकाळली म्हणून आम्ही काय झाले ते पहाण्याचा प्रयत्न करीत होतो. इतक्यात एका मोटारगाडी कॉलनीकडूनच आमच्या दिशेने अतिशय वेगाने येताना दिसली. शारीनची ती हिरवी टोपी मला दिसली. शारीनचा चेहरा घाबरलेला दिसला व त्याच्या कोटाची कॉलर घट्ट पकडून कामगार व शेतकरी नियंत्रण खात्याचा प्रमुख चरनेन्को बसलेला दिसत होता.

ब्राटचिन्कोला विचार करायला वेळच नव्हता. कारण लॅंडीने घाबरून लगाम इकडे तिकडे फिरवला होता. एवढ्यात आमची कॉलनीची गाडी काही मुलांना घेऊन भर वेगात समोरून येताना दिसली. काराबानोव गाडी चालवीत होता व त्याची नजर वेगाने जाणाऱ्या मोटारगाडीवर खिळली होती. बरीच मुले गाडीत बसली होती. गाडी आम्हाला पाहून कशीबशी थांबली. कारावानोव सोडून सारी पोरे खिदळत उतरली. काराबानोव गाडीत तसाच उभा होता. झाले ते बरे नव्हे, असा आविर्भाव त्याच्या चेहऱ्यावर होता. त्याने रागाने कोणाशीही न बोलता गाडी कॉलनीकडे वळवली व तो निघून गेला.

बाकीच्या मुलांना हा काय प्रकार आहे ते आम्ही विचारू लागलो. सारी मुले खिदळत होती. त्यांनी मला सांगितले, 'काय झालं ते आम्हाला कुठं ठाऊक आहे ?' त्यांनी पाहिलेले असूनही काय झाले याची त्यांना कल्पना नव्हती व ते कुठे व कशासाठी जात होते तेही त्यांना माहीत नव्हते. जागेवर पोचल्यावर ते कळणारच होते. झादारोवने काय झाले ते व्यवस्थितपणे सांगितले.

'त्याचं असं झालं आन्तोन, ते लोक मोटरने येऊन थडकले. आम्ही सारे कामात होतो. ते आलेले आम्हाला कळलंच नाही. सरळ तुमच्या ऑफिसात ते गेले आणि त्यांनी काही तरी केलं. आपल्या एका पोरानं पाहिलं की, ते तुमच्या टेबलाचे खण धुंडाळत होते. छोटी मुलं तुमच्या ऑफिसमध्ये पुढच्या पोर्चमध्ये जमली होती. खानसाहेबांना तुम्ही डायरेक्टरची जागा द्या, असं त्यांनी सांगितलेलं मुलांनी ऐकलं. झालं. आरडाओरडा व्हायला सुरुवात

झाली. कोणी तसा पाहुण्यांचा कोट पकडला. बुरुन कॉलनीभर ओरडत उठला, 'आन्तोन, तुम्ही काय केलंत ?' सारा एकच गोंधळ. मी व इवानसाहेबमध्ये पडलो नसतो तर मारामारीच झाली असती! त्यातले ते काळेसे गृहस्थ चांगलेच घाबरले व घाईघाईने मोटारीत जाऊन बसले. गाडी सुरू केली. गाडी निघून गेल्यावर त्याच्यामागे मुठी वळून मुलं ओरडत गेली. इतक्यात सेमियात आपली रिकामी गाडी घेऊन दुसऱ्या कॉलनीहून परतला. असा हा सारा प्रकार '

आम्ही एव्हाना कॉलनीत पोचलो. काराबानोव जरा शांत झालेला दिसला. तो घोड्यांना पागेत घेऊन गेला होता. एकीकडे ब्राट-चिन्कोच्या रागावण्याला उत्तर देत होता.

'घोडे म्हणजे जणू काही मोटारगाड्यांसारखे तुम्ही वापरता काराबानोव. तू त्यांचा अगदी घामटचा काढलास.'

'अरे ब्रॅटचिन्को, आम्हाला असा विचार करायला वेळ तरी होता का ?'

'अरे बाबा, तुझ्या आधी शहरातल्या ऑफिसातच ते कळलं होतं. तुम्ही सारे मस्त जेवलात आणि आमची मात्र पोलिसठाण्यावर धिंड निघाली.'

माझे सारे सहाध्यायी कमालीचे भेदरलेले दिसत होते. इव्हान-साहेबांना तर आम्ही बिछान्यावर झोपवलेच.

'आन्तोनसाहेब, याचा शेवट काय झाला असता याचा जरा विचार करा.' त्यांच्या चेहऱ्याकडे बघवत नव्हतं. मारामारी होणार याबद्दल शंकाच नव्हती; पण झादारोव सोडून साऱ्यांची डोकी भडकली होती. तोच तेवढा शांत राहिला होता.

मी मुलांजवळ आणखी काही चौकशी केली नाही. काही विशेष झाले नाही असेच दाखवले. त्यांनी पण फाजील चौकशी केली नाही. कदाचित त्यांना त्यात फारसा रसही नसेल. गॉर्की कॉलनीची मंडळी तशी मोठी व्यवहारी होती. मला शिक्षणखात्याकडून बोलावणे आले नाही व मीही तिकडे गेलो नाही.

एका आठवड्यानंतर काही कामासाठी मला तिकडे जावे लागले. त्या वेळी शिक्षणखात्याच्या चेअरमनकडून मला बोलावणे आले. त्याचे नाव चेरनेन्को.


त्यांनी मला अगदी आपल्याजवळ बसवून घेतले. माझा हात आदराने दाबोत मला ते म्हणाले, 'तुमची पोरं अगदी मस्त आहेत हं. शारीनकडून ऐकल्यावर माझी अपेक्षा ही मुलं फार वाईट परिस्थितीत असतील अशी होती; पण हे चांगले टगे आहेत हो. आमच्या भोवती असं कोंडाळं केलं त्यांनी. पक्के तयार आहेत हं. आमच्यावर असे धावून आले म्हणता. छान हं! शारीनची तर बोबडीच वळली. ते म्हणाले, 'आपल्याला यांनी पकडलं तर ?' त्यांना धीर देत मी म्हटले, 'मोटर बंद पडली तर तो प्रसंग येईल.' पण खरोखर अशी गंमत मी कित्येक दिवसांत अनुभवली नव्हती. मी जेव्हा जेव्हा लोकांना हे सांगतो तेव्हा त्या सर्वांची अगदी हसून मुरकुंडी वळते.'

त्या दिवसापासून मी व चेनरेन्को खरे मित्र बनलो.

(क्रमशः)


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी........



**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

लेखक : वि. ग. कानिटकर

आवृत्ती : तिसरी (सचित्र)

किंमत : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे

पुस्तके

# लास्ट टँगो इन् पॅरिस

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी

टॉलस्टॉयची 'वॉर अँण्ड पीस' ही कादंबरी, जितकी चर्चा केली जाते, तेवढी वाचली जात नाही. कारण तिची प्रचंड पृष्ठसंख्या! सध्या भारतात गाजत असलेल्या 'गॉडफादर' ह्या पुझोच्या कादंबरीवर आधारलेल्या चित्रपटाची हकीकत न्यारीच आहे. वाचून चर्चा होण्याचे भाग्य तिला लाभले आहे. आज जिची टीका हाती घेतली आहे ती कादंबरी व तिचा चित्रपट 'लास्ट टँगो इन् पॅरिस' दृश्य आणि लिखित स्वरूपात 'गॉडफादर'सारखेच गाजले. भारतीयांना 'लास्ट टँगो'चे दृक्-श्राव्य दर्शन लाभले नाही. कादंबरी तशी छोटेखानीच आहे, तरीही जबरदस्त आहे 'लास्ट टँगो'तील दृश्यांचा 'पोर्ट फोलिओ' फिल्मी नियतकालिकांनी गाजवला. हिंदी चित्रपट 'स्टार्स'नी आपले निर्बुद्ध, ऐषआरामी व अश्लील जीवन कसे तुलनेने 'सोवळे' आहे, हे सिद्ध करण्यासाठी निर्मात्यांच्या खर्चाने परदेशात गेले असता 'लास्ट टँगो' पाहून 'अश्लील' 'गलिच्छ' म्हणून आरोळ्या ठोकल्या. जसे सौंदर्य पाहणाऱ्याच्या नजरेत असते, तसेच काहीसे अश्लीलतेबद्दल म्हणता आले, तर काही जणांना धक्का बसण्याचीही शक्यता आहे.

ज्याला कुणी अश्लील म्हणेल, त्याला दुसरा, आशयाची प्रामाणिक अभिव्यक्ती मानण्याचीही शक्यता आहे. त्रिखंडात गाजलेल्या आपल्या चरित्रात बर्ट्रान्ड रसेलनी जो समाज आपल्या लैंगिक भावना-विकारांना जास्तीत जास्त मोकळेपणाने वाव देतो, तो कलात्मकदृष्ट्या अधिक प्रभावी आविष्कार करू देतो, तो अधिक समृद्ध—मॅच्युअर असतो, असे मत व्यक्त केले आहे. एके काळी 'लेडी चॅटर्लीज् लव्हर' अश्लील होती, आता ती तशी आहे का? गेल्या काही वर्षांत एकूण मूल्य एवढी बदलली की, अश्लीलतेची व्याख्याच मुळासकट बदलून जावी.

स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांची वर्णने, संभोगाची वर्णने किंवा जननेंद्रियांचे उल्लेख हे अश्लील असतील तर कामसूत्र, आरोग्यशास्त्र ह्या विषयांची क्रमिक पुस्तकेही अश्लील ठरतील. पूर्वी होळीच्या निमित्ताने लिहिलेली 'डबल् आंतांद्र'—द्वयर्थी अर्थाची कार्डे-पत्रे लिहिली जात. काही वेळा एका आड एक ओळी वाचल्या तर त्या चक्क 'अश्लील' असत. अखेरीस आपण 'अश्लीलता' कशी हाताळतो, ह्यावर अश्लीलतेचे स्वरूप अवलंबून असते. मर्ढेकरांच्या कविता, र. धों. कर्व्यांचे संततीनियमनाचे समाजकार्य करणारे ह्यांना अश्लील मानणारे आपण 'लास्ट टँगो'ने हादरून, गळून जाऊ हें खरेच!

हल्ली नासिक, पुणे, मुंबई येथील फूटपाथपासून ते प्रतिष्ठित ग्रंथालयापर्यंत सर्वत्र 'अनामिक' ह्या लेखकाची (?) पुस्तके मिळतात, त्यांना अश्लील म्हणता येईल असे वाटते. कारण 'कव्हर टू कव्हर' ती पोर्नोग्रॅफिक असतात. तरीही ती पुस्तके भारतात हजारोंनी खपतात. २ ते ५ टक्के भारतीय छापील इंग्रजी वाचू शकत असतील. तरीही हा प्रचंड खप कुठे होतो? इंग्रजीचे ज्ञान आणि 'एलिट' असणे हे भारतातले आणखी एक स्तोम आहे आणि हेच 'एलीटस्' अश्लीलतेविरुद्ध ओरडणाऱ्यात अग्रभागी असतात. शब्द वाचणे व शब्द लिहिणे हेच त्यांचे भांडवल आहे. म्हणूनच हॅम्लेट विषादाने खंत करतो ना—'वर्डस्! वर्डस्!! वर्डस्!!!'

फ्राइडसाहेबांनी 'लिबिडो'चे महत्त्व प्रतिपादन केल्यापासून जगभर भूकंप झाल्यासारखे झाले. हळूहळू जगाने फ्राइड पचवला; आम्हाला अजून पचला नाही—(उचकी लागतेच!) पोर्नोग्रॅफी म्हणजे अश्लील वाङ्मय, ही गोष्टदेखील समाजाच्या संदर्भात एक कार्य करत असते, ही वस्तुस्थिती नाकारणे म्हणजे पुन्हा ढोंग आले. मालविकेला अंगांग प्रदर्शित करणारी झिरझिरीत वस्त्रे घाला (की काढा?) म्हणजे अग्निमित्राची मजा येईल, हे कालिदासाच्या एका स्त्री-पात्राचे मत आजही तेवढेच चविष्ट नाही का? प्रत्येक समाजाला एक 'दुहेरी नीतिमत्ता' जोपासावी लागते. दुर्दैवाने हे दोन्ही पेड कधीकधी एकदम परस्पर विरोधी असू शकतात. नीतिमत्तेविषयीची आमची मते अशीच आहेत. म्हणजेच जगापुढे आपण आधुनिक म्हणून मिनी-स्कर्ट घालणार; परंतु त्यातील शरीर अत्यंत पवित्र वगैरे—(ज्याला डॉ. लोहिया 'योनिशुचिता' म्हणत—) असण्याचा आग्रह धरणार! मानवी समाजात हे गृहीत तत्त्व हातचे राखावेच लागते. वास्तविक कादंबरी ही कादंबरी असते, ती अश्लील वगैरे नसते. 'लास्ट टँगो' कादंबरी पाश्चात्य उद्ध्वस्त जगाचा सणसणीत साक्षात्कार आहे. तो तसा घडू शकला तर तिच्यातील लैंगिक वर्णने खटकणार नाहीत. असो!

अभिसारिकेची अकारण अभिलाषा व शरीर उताराला लागले तरी उसडत जाणारे पुरुषी पाशवी पॅशन्स् ह्यांचे तांडव, त्यांतील लय—विलय, लास्य आणि दास्य, अगतिकता आणि हताशता, अटळ अपरिहार्यपणा आणि अगतिकता ह्यांसह रॉबर्ट अॅलीने टिपले आहे. 'लास्ट टँगो' वर चित्रपट निघून तो मार्लन् ब्रँडीमुळे गाजला तेवढा गाजला नसता तरी ती कादंबरी हा एक उन्मळून टाकणाऱ्या मनोवस्थेचा उद्गार निश्चितच वाटला असता. कलात्मकता म्हणजे गोडगोड कमावलेली भाषा व सुभाषितांची पखरण नसते, तर अस्सल अनुभवाची संपादणी असते. तव्यावर टाकलेली भाकरी, तिचा पाणी लावलेला भाग तव्यावर जाताच जो चटका बसतो, तापलेली पळी जशी चर्रर करत द्रव पदार्थ कापत जाते, असा चटका लावण्याचे सामर्थ्य 'लास्ट टँगो' ह्या जगभर सनसनाटी निर्माण करणाऱ्या कादंबरीत आहे की नाही, हा खरा प्रश्न

आहे. पॉल ह्या पुरुषाची आणि जीन ह्या स्त्रीची 'लास्ट टँगो' ही एक अत्यंत वादळी – 'रॉ' अशी, म्हटलं तर प्रेमकथा आहे. कादंबरीभर ही दोनच पात्रे भेटत, हालत, बोलत, मिळत, 'विरहत' अखेरीस तुटत राहतात. जीनाला एक सिनेमादिग्दर्शक-निर्माता टॉम नावाचा प्रियकर आहे. तो प्रियकर जेवढा 'कनव्हेन्शनल' आहे, तेवढेच पॉल व जीनचे संबंध वादळी व वादग्रस्त आहेत. पॉलची एक रोझा नावाची बायकोही आहे – किंवा होती; पण तिने आत्महत्या केलेली असते. त्या रोझाचा एक प्रियकर रोझाच्याच मालकीच्या हॉटेलमध्ये राहात असतो. वासनांची गुंतागुंत तशी प्रचंड आहे.

पॉल आणि जीन एक घर पाहण्याच्या निमित्ताने भेटतात. जुना फ्लॅट – त्याची मधली खोली गोलाकार! म्हणजे जीन व पॉल आदिम स्त्री–पुरुष व तो गोल हॉल ही पृथ्वी का? जीन ही टॉमच्या चित्रपटांतून कामे करत असते. म्हणजे सुंदर, घाटदार (फुल–व्हिगरस बॉडी) वगैरे आहेच. तो टॉम व त्याचा चित्रपट म्हणजे प्रत्येकाच्या व्यक्तिगत जीवनाबाहेर सतत वाहणारे व वाहतूक असणारे जग असावे. जीन पॉलला पाहते तेव्हा पॉलच्या डोळ्यात अश्रू असतात. स्त्रियांना वाटणाऱ्या अश्रु-विषयक सहानुभूतीने (इव्हचा त्या 'अॅपलने' ही तेवढा घात केला नसेल) स्त्रियांचे केवढे नुकसान केले आहे! तिच्याहून पॉल जवळ जवळ दुप्पट वयाचा असूनही तिला त्याच्याबद्दल ओढ वाटू लागते. नंतर तेवढीच तिडीकही वाटू लागते.

'टँगो' मध्ये पात्रांची गर्दी वा शब्दांचीही गर्दी नाही. 'टँगो' हा नाचाचा एक प्रकार आहे. तसा उन्मादक आणि चेतविणारा. शरीरातून शरीरात नेणारा शरीरे त्यज-विणारा– तापवून विझविणारा! 'टँगो' शारीरिक जवळिकेने सुरू व्हावी ह्यात नवल नाही. कादंबरीचा प्रारंभ स्त्री-पुरुष शरीर-संबंधाच्या टँगोने होतो, तर शेवट एका खऱ्या, क्लबमधल्या 'टँगोने' होतो. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या। शरीरानुभव सत्य, इतर मिथ्या, ह्या थाटात 'टँगो' सुरू होते. टॉम ही जीनची व्यवहारी बाजू, तर रोझाची आत्म-हत्या ही पॉलची वास्तव पार्श्वभूमी. ह्यातून जीन व पॉलचा वासना–हलाहलाचा टँगो घुमत पिंगा घालत राहतो. शेवटी शरीराच्या पलीकडे असणारा 'अपूर्वा' गाठण्यासाठी शरीराच्या रूढ रस्त्यानेच प्रवास करावा लागतो. माणूस म्हणजे तरी काय अखेरीस? शरीर, भावना, आत्मा, आतडी, जननेंद्रियं, मेंदू, की आणखी काही? की ह्या सर्वांचा हताश मलिदा?

पॉलशी संबंध तोडावेत असे ठरवत ठरवत जीन त्याच्याकडे अधिकच वाहवत, ओढत जाते. पुरुषांचे शारीरसामर्थ्य हे स्त्रीला एकाच वेळी हवेहवेसे व तुच्छ, तिरस्करणीय वाटत राहते. त्या जुन्या वैराण फ्लॅटमधल्या प्रत्येक 'मलीन' शारीरसंबंधानंतर पुन्हा कधी इकडे न येण्याचे ठरवूनही जीन पुन्हा येतच राहते. परस्परांची नावे माहिती नसणारी जीन व पॉल परस्परांवर परस्परांच्या शरीरांचा गुलाल उधळत राहतात. स्त्री-पुरुष वासनांची शारीरिक अभिव्यक्ती ही जेवढी इंटिमेट, तेवढीच बोअरिंग गोष्ट आहे. तरीही 'डोन्ट किस मी. इफ यू किस मी, आय वोन्ट बी एबल टू लिव्ह!' म्हणत जीन वासनेच्या वेदीवर स्वतःचा बळी चढवीत राहते– नियमितपणे. वासनांच्या प्रलयात, अजून जे जे स्मरणात आहे ते ते विसरले जावे, असा पॉलचा प्रयत्न असतो. त्या गोल खोलीच्या गर्भाशयात जुळ्या जीवांप्रमाणे पडून स्वस्थ शांत राहण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. वास-नेचे तीव्र तीक्ष्ण टोक अडकविण्यासाठी 'म्यान' अशा भावनेने तो जीनकडे पहात असतो. भूतकाळ विसरण्याचा आटापीटा करणारा पॉल जेव्हा खरंच जीनच्या प्रेमात पडून स्थैर्याची स्वप्ने पाहतो, तेव्हा दुसरीकडे जीनला वस्तुस्थितीची– पॉलचे वय, कठोर स्वभाव– आदींची व्यवहारी जाण येऊन ती पॉलपासून दूर जाऊ पाहते. ह्या दोन परस्परविरोधी धावण्यांतून संघर्ष उभा राहून जीनच्या हातून पाठलाग करणाऱ्या पॉलवर गोळी झाडली जाते. जीन पॉलचा खून करते. जगातील प्रिय वस्तूंना कधी कधी आपल्या आपल्या हाताने मूठमाती द्यावी लागते, ती अशी. पॉलने जीनचा पाठलाग करणे ही देखील अशीच विकल, विफल गोष्ट आहे. 'डिझायर ऑफ मॉथ फॉर ए स्टार'–शेवटी ज्यावरून जीव कुर्बान करावा त्या वस्तू आणि व्यक्ती अशा काही दुरावतात की खरे काय ह्याचा संभ्रम पडावा. राग खरा की द्वेष खरा? शेवटी दोन्हीही खोटी, तेवढीच खरीही असतात. एका अबोध अर्थाने आपली सर्वांचीच आयुष्ये आपापल्या वस्तीतले 'लास्ट टँगोच' नसतात का? उछलकूद, आदळआपट, अभिनय, अभिव्यक्ती कितीही वेतून जमविण्याचा प्रयत्न केला तरी शेवटचा दिस गोड होणे आपल्या हाती नसते. शरीराचे खत घातले तरी प्रेमाचे बीज उगविण्यासाठी भूमीचाच पत्ता नसेल तर?

उघड्या जननेंद्रियांचे पानोपानी उल्लेख असलेली उत्तान शरीर–प्रेमाची भरपूर वर्णनं असलेली 'लास्ट टँगो' वाचून वाचकाचे शरीर 'भरून' येत नाही. डोळे भरून आले नाहीत तरी मन भरून आल्यासारखे जरूर वाटते. मला वाटते, अव्वल नसली तरी चांगल्या कलाकृतीच्या आस्वादानंतर अनु-भवांची तीव्रता वाढली तरी ती कामगिरी थोडकी नसते. 'लास्ट टँगोची' खाली-वर करणारी लयबद्ध स्प्रिंग झपाटून टाकणारी वस्तू आहे. *

लास्ट टँगो इन पॅरिस
लेखक : रॉबर्ट अॅली
प्रकाशक : डेल बुक
किमत : सुमारे १० रुपये
(एप्रिल १९७३ ते डिसेंबर १९७३ पर्यंत ४ आवृत्त्या)


'कलाकृतीची संदर्भमुक्तता लाभलेली समर्थ कलाकृती'
–प्रा. स. शि. भावे

# जनांचा प्रवाहो चालिला

विनय हर्डीकर । राजहंस प्रकाशन, पुणे । किंमत वीस रुपये

रंगभूमी

# गर्दीत गर्दीतला

**प्रायोगिकतेमध्ये गुदमरलेली रूपककथा**

'थिएटर' निर्मित श्री. शफाअत खान यांनी लिहिलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या 'गर्दीत गर्दीतला' या नाटकाचा पहिला प्रयोग नुकताच छबिलदासच्या रंगमंचावर सादर झाला.

शहराच्या गर्दीतला माणूस सत्याचा शोध घेण्यासाठी धडपडतो. ते त्याला गवसत नाही. त्याच्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या काही बाजू त्याआड येतात. प्रयत्न करूनही या बाजू त्याला नष्ट करता येत नाहीत; स्वतःशी झगडतानाच त्याचा अंत ओढवतो, हा या नाटकाचा आशय आहे. हा आशय रूपककथेतून व्यक्त केला आहे.

गर्दीतला एक माणूस कोणत्या तरी प्रश्नाचे उत्तर शोधीत येतो. तो ज्या प्रदेशात येतो तेथे भाले घेऊन लोक उभे आहेत. त्यांच्या देवीला नरबली हवा आहे. म्हणून या बाहेरच्या माणसाचा नैवेद्य दाखवायचे ते योजतात. तो पळून जायला धडपडतो; परंतु प्रमुख बजावतो, 'येथून कोणाला निघून जाता येणार नाही!' तो तिथेच राहतो—एका शापित वाड्यात राहतो. या वाड्याच्या बाहेर कोणी पहारेकरी नाहीत. दारे उघडी आहेत, तरी त्याला बाहेर पडता येत नाही. इथे एक गोड तरुणी भेटते. फुलांची भाषा समजणारी तरुणी. ती त्याला कायमची सोबत देईन म्हणते. आपल्याला जे हवे होते ते मिळाले, असे त्याला वाटते; पण ते वाटणे चूक आहे— जे मिळाले तेच हवे होते ते समजण्याची चूक तो करतो आहे, अशी सावधगिरीची सूचना म्हातारा देतो. ती तरुणी निघून जाते. हा पुन्हा धडपडतो. याचा शोध पुन्हा सुरू होतो. तो भालाधारी, मिशनऱ्यासारखा पोषाख केलेला, भगवा पोषाख केलेला म्हातारा सगळ्यांना ठार करण्याचा प्रयत्न करतो; पण कोणीच मरत नाहीत. सगळे त्याच्याभोवतीच फास आवळतात. त्याचा अंत ओढवतो.

तत्त्वज्ञानाकडे झुकणाऱ्या या विषयाचा आविष्कार विषयानुकूल अशा रूपककथेतून झाल्यामुळे श्री. शफाअत खान यांचे हे नाटक त्यांच्या 'मुंबईचे कावळे'प्रमाणे उथळ वाटत नाही. ते कुठे तरी कलेच्या जवळ येते. मात्र अपेक्षित आशय समर्थपणे अभिव्यक्त होऊ शकलेला नाही.

या नाटकाचा विषय तसा नवा नाही. नववाङ्मय, नवचित्रकला यातून अनेकदा हाताळला गेलेला हा विषय आहे. मर्ढेकर, जी. ए. कुलकर्णी वगैरे मंडळी प्रत्यक्ष—अप्रत्यक्षपणे या विषयात शिरलीच आहेत. पूर्वासुरींनी हाताळलेला विषय हाताळण्यात त्या कलाकृतींचे किंवा कलाकारांचे काही न्यून नाही; परंतु जेव्हा कळत-नकळत पूर्वासुरींचे अनुकरण होऊ लागते, तेव्हा एक सांकेतिकता निर्माण होते. शब्द निर्जीव होतात आणि कला भ्रष्ट होते, तसे इथे झाले आहे.

'बिनचेहऱ्याची अक्षरे एकमेकांत तंगड्या अडकवून पडलेली', 'सुखी जीवन गल्ली-गटारातून वाहिलेलं पहाणंच तुझ्या नशिबी आहे,' 'मांड्या फाकवून पडलेले रस्ते', 'आकाशात सूर्य मेला', 'इ. स. पूर्वी काय झालं?', 'गर्दी जगत नसते. फक्त जिवंत असते', 'हा लिबलिबीत अंधार', 'शहराच्या डोक्यावरचा सूर्य कळकट, मळकट' अशा वाक्यांची लयलूट ऐकल्यावर वाटते, यात लेखकाला नेमके काय व्यक्त करायचे आहे? कोणत्याही शब्दांना, वाक्यांना माझा विरोध नाही. फक्त कलाकृतीत प्रत्येक शब्द अर्थवाही असणे आवश्यक असते. अंधार लिबलिबीत म्हणजे कसा? सुखी जीवन गल्ली-गटारांतून का वाहाणार? आकाशातला सूर्य का मेला? (ही नवी मंडळी सूर्यावर फार तुटून पडतात. कधी म्हणतात, सूर्याला गिळू. कधी म्हणतात, सूर्यावर थुंकू, सूर्याला तुडवू, आणखी असेच काहीबाही. त्याने यांचे काय घोडे मारले आहे कळत नाही.) या शब्दांनी प्रेक्षकांपर्यंत कोणता अर्थ पोचवला? या अशा शब्दांमधून काय म्हणायचे आहे ते सरावाने किंवा थोड्या अभ्यासाने कळू शकते. गोंधळलेल्या, उद्विग्न, वैफल्यग्रस्त मनाला जाणवणारे भोवतालच्या जगाचे विस्कटलेले, विकृत दर्शन येथे घडवायचे आहे. व्यक्तीच्या मूड-प्रमाणे भोवतालच्या जगाचे रंग वेगळे दिसतात, हे मान्य करूनही सांगावेसे वाटते की, प्रस्तुत नाटकात हे जे काही प्रेक्षकांना कळते, ते कळणे अंतःकरणाचे नाही. ते कळणे सरावाचे किंवा अभ्यासाचे आहे, हिरवा दिवा म्हणजे रस्ता ओलांडायला हरकत नाही. लाल दिवा म्हणजे थांबायचे, हे जसे सर्वसामान्य संकेतामुळे कळते, त्याच बुद्धीने ही निराशा, उद्विग्नता कळते. नाटक त्यामुळे केवळ शब्दबंबाळ वाटते. तेंडुलकर, गाडगीळ, मर्ढेकर, खानोलकर, जी. ए. कुलकर्णी यांनी जे शब्द, प्रतिमा वापरल्या आहेत त्यांचे हे कळत-नकळत केलेले अनुकरण आहे. शब्द अंतःकरणातून स्फुरलेले नाहीत आणि म्हणूनच ते पोकळ वाटतात. अपेक्षित अर्थाभिव्यक्ती करण्यास असमर्थ ठरतात.

अपयशाचे दुसरे कारण भूमिका करणाऱ्या व्यक्तींची अभिनयशून्यता. असा गंभीर आशय व्यक्त करताना चेहरा विलक्षण भावदर्शी असणे आवश्यक आहे. आशा-निराशा, वेदना यांचे तांडव पात्रांच्या डोळ्यांत जाणवले पाहिजे या नाटकात ती प्रक्रिया घडतच नाही. वाक्य प्रेमाचे असो, निराशेचे असो किंवा तत्त्वज्ञानाचे असो एकाच सरधोपटपणे कोरड्या चेहऱ्याने ते सारखे उच्चारले जाते. लहान मुले 'पावसाच्या धारा येती झरझरा' आणि 'विव्हळला श्रावणबाळ' या दोन्ही कविता एकाच पट्टीत सारख्याच उत्साहाने म्हणतात, तसाच हा प्रकार आहे. पट्टयापट्टयांचा झगेवाला भालाधारी, मिशनऱ्यांसारखा वाटणारा तपकिरी झगेवाला, भगवा झगेवाला म्हातारा ही त्या सत्यशोधकाच्या व्यक्तिमत्त्वाचीच रूपे आहेत, हेही सरावाने कळते. ती सगळीजणे सांगतात, 'मी सतत तुझ्याबरोबर आहे. बघ, मला डोळे नाहीत. नुसत्या खाचा आहेत.' यावरून ती एकाच व्यक्तिमत्त्वाची रूपे आहेत हे लक्षात येते; परंतु एकंदर अभिनयातून तशी प्रतीती येत नाही.

रंगमंचावर फळ्या टाकून काही उंचवटे तयार केले होते. पात्रे कधी उंचवट्यावर उभे राहून, कधी खाली येऊन बोलत होती. रंगमंचावर हे उंचवटे नसते तर काही

बिघडले असते, असे वाटत नाही. सगळ्या पात्रांची वेषभूषा ग्रीक पद्धतीची होती. त्यामुळे एकंदर नाटकावर परकीय छटा वाटत होती. नाटक अनुवादित आहे असाही भास त्यामुळे होत होता.

शांक-नील यांचे पार्श्वसंगीत आणि सिराजखान यांची प्रकाशयोजना नाटकाच्या गंभीर आशयास पोषक होती. सुहास पळशीकर, अनिल कामत, प्रमोद पवार, रघुनाथ मिरगळ, माधवी माऊसकर, अजित भगत, प्रदीप इंगळे, विजय कदम, शफाअतखान यांनी या नाटकात भूमिका केल्या होत्या.

शब्दांची आतषबाजी टाळली असती आणि अभिनय सुजाण असता तर कलेच्या विवक्षित टप्प्यापर्यंत हे नाटक निश्चितच येऊ शकले असते. ※

## रेग्यांच्या दोन नाटिका

**प्रयोगशील कलावंतांना आव्हान**

१७ फेब्रुवारी–पु. शि. रेगे यांची पुण्यतिथी. मुंबईच्या 'संकल्प' या हौशी नाट्यसंस्थेने या पुण्यतिथिदिनी रेग्यांच्या दोन नाटिका करण्याचे योजले; परंतु काही तांत्रिक कारणांमुळे या दिवशी त्या नाटिका होऊ शकल्या नाहीत. दि. १ मार्च १९७९ या दिवशी 'माधवी–एक देणे' आणि 'चित्रकामाख्यम्' या पु. शि. रेगे यांच्या दोन नाटिका त्यांच्या स्मृत्यर्थ छबिलदासच्या रंगमंचावर करण्यात आल्या. छबिलदासचे नाट्यगृह खच्चून भरले होते.

पु. शि. रेगे यांच्या साहित्याविषयी आणि नाटकांविषयीही यापूर्वी बराच विचार होऊन गेला आहे. पु. शि. रेग्यांच्या या नाटकाचे संस्कृत महाकाव्यांशी नाते आहे. अजिंठ्याच्या चित्रकृतींची त्यांची जात आहे. तरीही त्यांनी परंपरा मोडली आहे. मात्र बंडखोरीचा आवेश त्यांना नाही. तशी आवश्यकताच नाही. रेग्यांचे श्रेष्ठत्व स्वयंसिद्ध आहे. आत्मतेजाने लुकलुकणाऱ्या तारकांसारखा मराठी नाट्यसृष्टीत त्यांचा वास आहे. कुणाचीच सावली आपल्यावर पडता कामा नये, अशा थोड्याशा महापावित्र्याच्या जाणिवेने लिहिणाऱ्या पु. शि. रेग्यांनी कोणाची नाटकपरंपरा स्वीकारली नाही आणि पुढे स्वतःची परंपरा निर्माणही केली नाही. विचार, विकार, मनोविश्लेषण, चिंतन, भावना, वासना, शृंगार यांचे दर्शन येथे आहेच; परंतु हे दर्शन त्यांच्या नेहमीच्या रसरसत्या स्वरूपात होत नाही. या सगळ्याला पौर्णिमेच्या शीतल चांदण्याची डूब आहे. किंबहुना या चैतन्यशील शीतलतेने त्यांच्या आरपार शिरून पूर्णपणे मिसळून जाऊन त्यांचे मूळ स्वरूप काहीसे बदलून टाकले आहे. म्हणून त्यांच्या नाट्यकृती वास्तवाला केवळ स्पर्शून, वास्तवाला आपल्यात सामावून घेत वास्तवापासून पुन्हा दूर जातात.

अशा या कलाकृती रंगमंचावर समूर्त करणे, उडत्या पाखरांना कॅमेऱ्याने टिपण्याइतके कठीण आहे. इथे पात्रांची केशभूषा, वेशभूषा, हालणे, बोलणे यातूनच अभिव्यक्ती होत नाही, तर इथे श्वासोच्छ्वासाचे प्रकटनही अर्थपूर्ण ठरते. शरिराचा कण नि कण बोलका होणे इथे अतिआवश्यक वाटते.

या दृष्टीने 'संकल्प'चा रंगमंचावरील प्रयोग पूर्णत्वाला पोचलेला नव्हता. या नाटकांचे दिग्दर्शक श्री. विनायक पडवळ होते. मोहन कुलकर्णी, मेधा वाघळे, उज्ज्वला वैद्य स्वाती टिपणीस, मिलिंद बेडेकर, अनंत जोग आणि स्वतः विनायक पडवळ यांनी भूमिका केल्या होत्या. 'संकल्प'चे दिग्दर्शक आणि कलाकार तसे 'ॲमॅच्युअर्स' आहेत. यामुळे प्रयोगाच्या पूर्णत्वाची अपेक्षा करणे रास्तही नाही. 'संकल्प'च्या कलाकारांचे कौतुक हेच वाटले की, नाटकाची प्रकृती ओळखून त्यांना समूर्त करण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला. छबिलदासच्या रंगमंचावर होऊनसुद्धा प्रायोगिक संप्रदायाची तंत्रे आणि बंडखोरीच्या नावाखाली चाललेला निर्बुद्ध तऱ्हेवाईकपणा यांचा या प्रयोगाला स्पर्शही नव्हता, हेही विशेष! निवडलेल्या सर्व व्यक्तींचे चेहेरे, शरीरयष्टी आपापल्या भूमिकेला अतिशय योग्य होती. त्यांची केशभूषा, वेषभूषा, हालचाल प्रेक्षकांना त्या पुरातन काळात सहजपणे घेऊन जात होती. 'संकल्प'च्या कलाकारांनी रेग्यांच्या कलाकृतीची कोणत्याही प्रकारे हानी केली नाही. एकच खटकले–संदिप्तीच्या भूमिकेतील स्वाती टिपणीस यांचा आधुनिक बॉबकट–कलाकृतीच्या वातावरणाशी तो पूर्णपणे विसंगत होता. अभिनयदृष्ट्या सर्वच कलाकारांमधे अजून सूक्ष्मता, परिपक्वता येणे आवश्यक आहे.

ही नाटके पहाताना वाटले, रेग्यांची नाटके प्रयोगशील कलावंतांची उत्सुकतेने वाट पहात आहेत. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा..........

**मॅक्झिम गॉर्की**

सुमती देवस्थळे

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ पुणे ३०

# मराठी चित्रपट महोत्सव

सदानंद बोरसे

ती सारी माझ्याभोवती फेर धरून नाचताहेत. ती सारी—काही सुबक, काही बेडौल, काही सतेज, काही विटलेली कदाचित सुरुवातीपासूनही; पण सगळी जुनी आणि सगळी लागोपाठ भराभर डोळ्यांपुढून सरकताहेत. एखाद्याच्या जुनाटपणातील भव्यता मला दडपून टाकते, मग त्याचा ओबडधोबडपणा त्याखाली दबून जातो.

एखाद्याची सहजता मनाला भुरळ पाडते, मग त्याचा पुराणेपणा मी विसरून जातो.

एखाद्याचा डौलदारपणा सुबक रेषांमध्ये असा अडकवून ठेवतो की, त्यातील तोचतोच-पणाही सुबक आणि नेटका वाटू लागतो. एखाद्याची एखादीच रेषा मनाचा असा ठाव घेऊन जाते की, बाकीच्या भुऱ्या-धूसर चित्राची आठवण मागे पडून ती रेषा मात्र पक्का वण उमटवून ठेवते.

त्या सगळ्यांचीच अशी वैशिष्ट्ये पाहता पाहता त्यांचे एक आवर्तन पूर्ण होऊन दुसरे सुरू झालेले असते. माझी नजर पुन्हा त्यातून नवीन गोष्टी टिपू लागते.

फेऱ्यांमागून फेऱ्या चालू आहेत.

ती सारी माझ्याभोवती फेर धरून नाचताहेत.

*

महाराष्ट्र राज्यातर्फे मराठी चित्रपटांचा महोत्सव दि. २ ते ८ मार्चपर्यंत साजरा करण्यात आला. त्यात नवीन मराठी चित्रपटांपैकी देवकीनंदन गोपाला, भैरू पैलवान की जय, जैत रे जैत, पारध, लक्ष्मी, सासुरवाशीण आणि बन्याबापू हे चित्रपट दाखविण्यात आले आणि त्यांच्याच जोडीला लग्न पहावं करून, सरकारी पाहुणे, पेडगावचे शहाणे, अग्निकंकण, माझा बाळ, माणूस आणि रामशास्त्री हे सात जुने चित्रपट दाखविण्यात आले.

नवे व जुने चित्रपट म्हणजे केवळ 'हे चित्र पहा' आणि 'हे चित्र पहा!' असाच प्रकार होता. मध्ये फक्त 'अमुकतुमक वापरल्यानंतर' असे लिहिण्याऐवजी 'अमुकतमुक वर्षांपूर्वी' असे लिहिण्याची आवश्यकता. पुढेही 'ओ हो! मीच का तो?' असे विचारण्याऐवजी मराठी चित्रसृष्टीने आपल्या वर्तमानकाळाबद्दल 'अरेरे! मीच का ती?' असे विचारायचे.

म्हणूनच काही नव्या चित्रपटांबद्दल पूर्वीच सविस्तर लिहिले असल्याने, आणि उरलेल्या चित्रपटांना अनुल्लेखानेच मारण्याचे ठरवून आज मी मुख्यतः जुन्या चित्रपटांबद्दलच लिहिणार आहे.

सर्व जुन्या गोष्टींप्रमाणेच चित्रपटांबद्दलची कौतुके आपण ऐकलेली असतातच. महोत्सवातील बहुतेक सर्व मराठी चित्रपटांबद्दल उदंड ऐकले होते आणि एक 'अग्निकंकण' वगळता बाकीच्यांच्या बाबतीत ते सर्व ऐकलेले खरे ठरले. कालानुक्रमे विचार करता 'अग्निकंकण' हा या सात चित्रपटांमधील पहिला—वहिला. चित्रपट साहजिकच या पहिलेपणाचे सर्व परिणाम त्यात दिसतातच.

चित्रपटाची सुरुवात होते तीच मुळी 'संगीत मराठी चित्रपट अग्निकंकण' अशा पाटीने. या पाटीपासून आणि सर्व श्रेयनामावलीच्या वेळी चालू असलेल्या नांदीच्या पार्श्वसंगीतापासून ते शेवटी म्हटलेल्या भरतवाक्यापर्यंत (चित्रपटात वाक्याच्या ऐवजी गीत आहे.) संगीत नाटकाचा हा जबरदस्त पगडा किंवा वरचष्माच कायम आहे. सेट आणि स्थळमर्यादा यांची ओलांडलेली बंधने सोडल्यास 'अग्निकंकण' हे संगीत नाटकच पडद्यावर चालते. चित्रपटाची कथाही एखाद्या संगीत वीरधवल वा संगीत भावबंधनला साजेशी—राजा—राणी, दुष्ट सेनापती, हिकमती राजपुत्र, राजपुत्राने सेनापतीचा घेतलेला सूड इत्यादी ठरीव ठशात फिरणारी. सर्व पात्रेही स्थळ-काळ निरक्षेपता बाळगून फक्त गाणी गाणारी. अत्यंत कृत्रिम संवाद आणि तितकीच कृत्रिम व एकसुरी संवादफेक, एका दृश्यात एकाच ठिकाणी खिळवून ठेवलेला कॅमेरा, भडक रंगभूषा, बागडल्यागत केलेल्या मारामाऱ्या वा लढाया आणि काही अपवाद वगळता बहुतेक कलाकारांचा खोटाखोटा अभिनय अशा कित्येक उणिवा (अर्थात त्यांपैकी काही स्वाभाविकच आहेत.) असूनही 'अग्निकंकण' मध्ये डोळ्यात भरतात एस. फत्तेलालांचे भव्य सेट, दुष्ट सेनापती, हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच पण अतिशय अप्रतिम टिपलेली काही दृश्ये आणि दिग्दर्शक व्ही. शांताराम टचेस्!

केवळ कागदी पुठ्ठ्यांमधून अथवा हलक्या लाकडातून उभे केलेले 'अग्निकंकण' मधील प्रचंड महाल, भव्य खांब, कोरीव पलंग, नक्षीदार सज्जे इत्यादींचा इतका वैविध्यपूर्ण आभास उभा करायचा म्हटला तरी आज एखाद्या ओ. पी. रल्हनला किंवा बी. नागीरेड्डीला एक—दीड कोटीचा खर्च असलेला बिग—बजेट चित्रपट काढावा लागेल!

आपल्या चेहऱ्यावरील रेषेरेषेतून, भुवईच्या—डोळ्यांच्या छोट्याशा हालचालीतून प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचे 'सेनापती'चे कसब तर केवळ आणि केवळ पाहण्यालायकच!

'अग्निकंकण'मध्ये व्ही. शांतारामांनी पडद्यावर दाखवलेली प्रतीके आज ओबडधोबड नाही, तरी बटबटीत वाटतात आणि त्यांनी (आणि इतरांनीही) केलेल्या प्रतीकांच्या अतिरेकामुळे आता कंटाळवाणीच नाही तर हास्यास्पद वाटतात; पण 'अग्निकंकण'च्या काळचा विचार करता त्यांचे अपूर्व नाकारता येणार नाही.

तर अशा या संगीत मराठी चित्रपट अग्निकंकणमधील गीतं, संगीत आणि संवादलेखनाची बाजू पेलणाऱ्या कै. गोविंदराव टेंब्यांचा उल्लेख करणे अपरिहार्य आहे.

त्यानंतर डोळ्यांपुढे येतात ते 'प्रभात'चे 'माणूस' आणि 'रामशास्त्री'. त्यातही 'माणूस' अधिक वैशिष्ट्यपूर्ण—पुढच्या अनेक कलात्मक आणि बाजारू दोन्ही प्रकारच्या चित्रपटांची मुळे या चित्रपटात सापडतात.

सैगलच्या 'देवदास' नंतरची नैराश्यवादाची लाट थोपविण्यासाठी 'माणूस'

काढला!

वेश्येचे माणूसपण, तिला एका संसारी स्त्रीचे जीवन सध्याची समाजव्यवस्था देऊ शकेल का? हा त्या काळी क्रांतिकारक विषयच होता आणि त्याहीपेक्षा त्या वेळीच नव्हे तर आजही प्रत्यक्षात असलेले त्या प्रश्नाचे लाचार, अगतिक नकारार्थी उत्तर आणि त्या उत्तरामुळेच मनात जास्त भिरभिरणारी त्या समस्येची, प्रश्नाची वावटळ—हे सगळे साधणारा 'माणूस'चा शेवट हा अधिक क्रांतिकारक होता. सुखान्त शेवटात संतोष मानणाऱ्या आपल्या स्वप्नरंजित प्रेक्षकाला एकाच वेळी जीवनातील अपरिहार्यतेला पचविण्याचा आणि परिहार्यतेला आव्हान देण्याची ऊर्मी निर्माण करण्याचा हा शांतारामबापूंचा पाठ होता.

'प्रेमाची फुटली पेठ, लुटू या प्रेमाचा बाजार' या संपूर्ण गाण्यात— गीताच्या शब्दाशब्दांतून (उदाहरणार्थ— प्रेमच चटणी, प्रेमच भाकर) आणि त्या वेळी पडद्यावरील बारीकसारीक कृतीतून (उदाहरणार्थ— शेवटी 'प्रेमात मेलेच पाहिजे' असे ठरवून मैना मरण्यासाठी आडवी होते; पण त्यापूर्वी पडण्याची जागा साफसूफ करते आणि गणपतही आत्महत्या करण्यासाठी पाण्यात उडी टाकतो; तर झऱ्याला अवघे घोटाभर पाणी.) 'प्रेम' या अत्यंत बाजारू व उथळ बनविलेल्या संकल्पनेचे जे अफलातून विडंबन केले आहे, ते एखाद्या बासू चटर्जीसाठीही आदर्श वस्तुपाठ ठरावे.

शाहू मोडक (गणपत), शांता हुबळीकर (मैना), घोरपडे (हवालदार), राम मराठे (रामू), गणपतच्या भाचीचे काम करणारी बालकलाकार इत्यादी सर्वच कलाकारांचा अत्यंत सहजसुंदर अभिनय (संवादफेक मात्र सदोष; पण हा दोष 'पेडगावचे शहाणे' हा चित्रपट. 'रामशास्त्री'चा काही भाग आणि दामूअण्णा मालवणकर, विष्णुपंत जोग इत्यादी काही कलाकार वगळता सर्वच जुन्या चित्रपटांमध्ये होता. अत्यंत नाटकी पद्धतीने वाक्य अक्षरशः फेकणे म्हणजेच योग्य संवादन अशीच समजूत असावी.) हे 'माणूस'चे एक ठळक वैशिष्ट्य.

इतकेच काय, पण नंतरच्या चित्रपटांमधून झालेल्या अतिरेकामुळे वा भ्रष्ट नकलांमुळे धंद्याचा भाग म्हणून बनलेल्या अशा 'माणूस'च्या ज्या भागाकडे बोट दाखवता येईल, तोही त्या काळात अनोखाच होता. उदाहरणार्थ— १. योगायोगांच्या साखळ्या. २. शांतारामबापूंची श्रेयनामावली काही तरी चमत्कृतिपूर्ण रीतीने सादर करण्याची पद्धत. ३. उर्दू, गुजराथी, पंजाबी, बंगाली, मद्रासी इत्यादी खिचडीने व्यवस्थित सजविलेले 'आता कशाला उद्याची बात' हे मसालेदार गीत, ४. आज 'माणूस'मधील मैनेचा—वेश्येचा पोषाख हा कदाचित आजच्या चित्रपटातील कुलीन, घरंदाज पतिव्रतेलाही लाजवील असा वाटेल; पण त्यानेही त्या वेळी धंदा करून घेतला असेल. तर अशा बऱ्याच गोष्टी या 'माणूस'ची वैशिष्ट्ये म्हणूनच नोंदाव्या लागतील.

गाणी हे 'माणूस'चे आणखी एक वैशिष्ट्य. 'आता कशाला उद्याची बात', 'मोहनीज ही जरा सोड, सोड, सोड', 'गुलजार नार न्यारी', 'प्रेमाची फुटली पेठ', 'आम्ही वळखलं ग', 'दिवाळी दिवाळी आली' अशी बहुतेक सर्वच गीते शब्द आणि सूर दोन्हींचे विविध पदर हातात धरून येतात.

या सर्व विश्लेषणाबरोबर किंवा त्याहून महत्त्वाचा असा समस्याप्रधान चित्रपट म्हणून 'माणूस'चा total impact राहतो, त्यात 'माणूस'नंतर मनात उठणाऱ्या प्रश्नांच्या भेंडोळ्यात त्याचे श्रेष्ठत्व भरलेले आहे.

'माणूस' इतकाच पण स्वतःच्या काही वेगळ्या वैशिष्ट्यांमुळे भिडणारा 'प्रभात'चा 'रामशास्त्री.'

एखादा ऐतिहासिक (वा प्रत्यक्षातील) व्यक्तिरेखेला हात घालणे हे आज जरा धाडसाचेच काम आहे; पण कदाचित 'रामशास्त्री'च्या वेळेस ते तेवढे धाडस वाटले नसेल. तरीही कोणत्याही प्रकारे रामशास्त्रींना भगवान रामशास्त्री न करता माणसाच्याच माणूसपणात कोरण्याचे विलक्षण कसब या चित्रपटात आहे. यात लहानपणीचा निःस्पृह, सत्यवादी राम आहे, तसा उनाड रामही आहे; विसाजीपंत लेल्यांना बेदरकारपणे शिक्षा ठोठावणारे न्यायाधीश रामशास्त्री आहेत, तसेच पुरावा हाती न मिळाल्याने अगतिक झालेले रामशास्त्रीही आहेत.

पण सगळ्यापेक्षा महत्त्वाचे 'रामशास्त्री'चे वैशिष्ट्य म्हणजे प्रसंग, व्यक्तिरेखांपासून शस्त्र-पोषाखापर्यंत सर्व बाबींमध्ये जिवंत केलेले चित्रपटातील ऐतिहासिक वातावरण. जणू गेलेल्या वर्षांची पाने भराभर उडून जाऊन तो भूतकाळ आपल्यापुढे वर्तमान साकार होतो. या सगळ्या साधार भूतकाळालाही कल्पनेची कलाबूत लावून तो समजावून प्रेक्षकांपुढे ठेवला आहे. उदाहरणार्थ— इतिहासात फक्त नारायणरावाचा खून व 'काका, मला वाचवा' एवढेच लिहिलेले असते. चित्रपटात मात्र 'सुखकर्ता, दुखहर्ता' या विघ्नहर्त्याच्या आरतीच्या पार्श्वसंगीतावर 'काका, मला वाचवा'च्या करुण किंकाळ्या घुमतात. राघोबादादांना देहान्त प्रायश्चित्त सुनावून बाहेर पडणाऱ्या रामशास्त्र्यांची, त्यांच्या मुलाची व पत्नीची प्रकाशमान क्षितिजावर दिसणारी काळी छायाकृती आणि मागे चालू असलेले 'अवतारच तू न खग, ब्रह्मभास्करा' हे गीत प्रेक्षकाला कुठे तरी उंच उदात्ततेत सोडून देते; पण ही उदात्तता चित्रपटाच्या सुरुवातीपासून विटे–विटेने बांधून काढली आहे.

'माझं बाळ' हा मा. विनायकांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट. कुमारी मातेच्या समस्येवरील हा चित्रपटही विषयाचे नाविन्य राखतोच; पण आधीच ठरवून टाकलेल्या सुखांतिकेमुळे चित्रपट अत्यंत चाकोरीतून वाटचाल करतो. कथा–पटकथा–संवाद–गीते एवढी भरभक्कम कामगिरी वि. स. खांडेकरांनी उचलल्यामुळे अपरिहार्यपणे आलेला आदर्शवादी वि. स. खांडेकरी थाट हे चित्रपटाचा प्रभाव कमी करण्यामागील एक प्रमुख कारण. त्यातही चित्रपटात 'कुमारी माता' ही समस्या बुद्धी विरुद्ध भावना अशा अत्यंत सवंग व पारंपारिक संघर्षरूपात मांडल्यामुळे तिची धार बरीच बोथट होऊन जाते.

अभिनय व संगीत या चित्रपटाच्या बऱ्यापैकी उल्लेखनीय बाजू. (आणि हो, छोटी लता मंगेशकर— तिचा अभिनय आणि गीते— यांचाही उल्लेख करायला हवा.)

राहता राहिले तीन चित्रपट. त्यांपैकी 'पेडगावचे शहाणे' हा त्या मानाने बराच अलीकडचा असल्याने त्यावर अधिक काही लिहीत नाही. उरलेले दोन चित्रपट 'लग्न पहावं करून' आणि 'सरकारी पाहुणे' हे दोन्ही चित्रपट हे चित्रपटांमधील बऱ्याच समस्या आज अस्तित्वात नसल्यामुळे अस्वलाच्या गुदगुल्या न वाटता, नुसत्याच

गुदगुल्या वाटतात. चि. वि. जोश्यांच्या चिमणराव व गुंड्याभाऊच्या भूमिकेत अनुक्रमे दामुअण्णा मालवणकर आणि विष्णुपंत जोग पडद्यावर जी धमाल उडवतात, ती आजच्या भल्याभल्या तथाकथित विनोदी नटांची छुट्टी करून टाकील! या चित्रपटांमध्ये काय अथवा 'माझं बाळ'मध्ये काय दामुअण्णा मालवणकरांची पडद्यावर वावरण्याची विलक्षण सहजता आणि सफाई तर आजच्या अत्यंत कसलेल्या व अनुभवी अभिनेत्याजवळही सापडणे कठीण. क्षणात रागावणारा, क्षणात खुलणारा, क्षणात रुसणारा, क्षणात हसणारा, क्षणात रडणारा भाबडा माणूस दामुअण्णा आपल्या व्यंगासकट अत्यंत कौशल्याने उभा करतात!

या सर्वच चित्रपटांमधून जाणवणारे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील विनोदाचे नितळ, सतेज, प्रसन्न आणि बहुढंगी स्वरूप! उदाहरणार्थ– १) 'लग्न पहावं करून'मध्ये आपल्या मुलीचे भरतकाम, विणकाम, कातरकाम इत्यादी कलागुण हौसेने दाखविणाऱ्या वधुपित्याला नवऱ्यामुलाची छोटी, मिश्किल बहीण एका वाघाच्या कातड्याकडे बोट दाखवून विचारते, 'हे पण तुमच्या मुलीनंच केलं का हो?' २) 'माणूस' बोटाला बांधलेल्या साडीच्या चिंधीवरून गणपतच्या भाचींने गणपतीची घेतलेली फिरकी. ३) माझं बाळ– दामुअण्णांचे सर्वच प्रसंग आणि त्यातून बुवाबाजीची उडवलेली खिल्ली. ४) 'रामशास्त्री'तील छोट्या रामचे व छोट्या जानकीचे प्रसंग. अशी किती तिरी उदाहरणे देता येतील. नवीन मराठी चित्रपटांपैकी 'भैरू पैलवान की जय' व 'बन्यावापू' हे संपूर्ण विनोदी चित्रपट (म्हणे.) पण पोटभर हसायला लावणाऱ्या अशा प्रसन्न विनोदांची किती ठिकाणे दोन्हीत मिळून सापडू शकतील? याउलट ओढून-ताणून विनोदी बनवलेल्या प्रसंगांनी संपूर्ण चित्रपट बरबटून टाकता येतील. हा सतेज प्रसन्नपणा आज मराठी चित्रपटसृष्टीने संपूर्णतः हद्दपार करून टाकला आहे!

तांत्रिकदृष्ट्या नवे चित्रपट किती तरी पट सरस होते, हे उघड आहे; पण तसे ते नसते आणि आपली ही बाकीची अन्य वैशिष्ट्ये त्यांनी टिकवली असती, तर ते अधिक उपकारक झाले असते.

☐

विदेशी चित्रपट

# द मीटिंग प्लेस

अशोक प्रभाकर डांगे

तो परंपराप्रणीत हिंदी चित्रपटातल्यासारखा एक नाकारलेला नायक नव्हता की ती एखाद्या बड्या बापाची बहकलेली बेटी नव्हती. तो परंपराप्रधान जपानी चित्रपटकथेतला सामुराई योद्धा नव्हता की ती किमोनो संस्कृतीतली खानदानी गेईशा नव्हती. तिला तरुण म्हणणं जसं अयोग्य ठरलं असतं तसंच सुंदर म्हणणंही अवास्तवातच जमा झालं असतं आणि त्याला राकट म्हणणं सुयोग्य ठरलं असतं, तसंच धट्टाकट्टा म्हणून गौरवणंही औचित्यातच मोडलं असतं. आयुष्याच्या बाजारात मार घेत, दोन देत वाढत गेलेला तो एक रांगडा तरुण होता, तर जीवनाच्या धकाधकीत खस्ता काढत पस्तिशीला पोहोचलेली ती एक मध्यमवयीन स्त्री होती. अर्थात ती दोघंही परिस्थितीच्या पटावरची अनामिक प्यादी होती. म्हणूनच ज्या परिस्थितीनं त्यांची अकल्पित भेट घडवून आणावी त्याच परिस्थितीनं त्यांची मनोमीलनाची घडीही उधळून द्यावी हे स्वाभाविकच होतं.

पण सत्य काही एवढ्यापुरतंच मर्यादित नव्हतं; कारण ज्या परिस्थितीनं तिची गुन्हेगारात गणना केली होती, त्याच परिस्थितीनं त्याचीही सराईत गुन्हेगारांच्या टोळीशी जन्मगाठ बांधली होती. अर्थात तिचा अपराध वैयक्तिक संदर्भापुरताच भयंकर ठरत असला तरी त्याचा अपराध सामाजिक संदर्भात अक्षम्य असणार होता.

त्याचं असं झालं, तो एका दूरच्या प्रवासाला निघाला होता. टोकियोतल्या कुठल्यातरी स्टेशनावरून निघाला असला तरी नेमकं कुठं जायचंय हे त्याचं त्यालाच माहीत असणार होतं; कारण त्याच्या ह्या कुठं तरी जाण्याभोवतीच गूढतेचं गर्द वलय होतं. नेहमीचाच एक योगायोग म्हणून त्या दोघांनीही एकाच डब्यात आणि तेही समोरासमोरच्या बाकावर बसावं हे कुठल्याही चित्रपटकथानकाला शोभेसंच होतं आणि मग अर्थातच तिनं त्याची चुकूनही दखल घेऊ नये आणि त्यानं तिचं लक्ष वेधून घेण्यासाठी नाना क्लृप्त्या लढवाव्यात, हेही कथानकाच्या ओघाओघात आलंच आणि एवढं सारं होऊनही हो एक पारंपारिक प्रेमकथा म्हणणं अन्यायाचंच होईल.

मग ती अत्याधुनिक रेल्वेगाडी गती घेते. तासांमागून तास धावत रहाते. एका बाजूला उसळता निळा समुद्र, तर दुसऱ्या बाजूनं हिरव्यागार रानांनी नटलेले दऱ्या–डोंगर अशा नयनरम्य वातावरणात नागमोडी रेलमार्गावरून ती तुफान धावत असते. अर्थात हा निसर्ग नयनरम्य असला तरी ह्या जपानी चित्रपटकथेच्या नायकाच्या कसल्याच उपयोगाचा नसतो. म्हणून तर तो डब्यातल्या एका लहानग्या पोराशी खेळ खेळायला जातो, तर तो चलाख पोरगा त्याच्या अभिनयाचा आविष्कार पाहून त्याला खुळ्यातच काढतो. मग तो तरुण पुन्हा एकदा आपला मोर्चा निर्विकार नजरेनं निसर्ग न्याहाळत बसलेल्या त्या धीरगंभीर स्त्रीकडे वळवतो. कदाचित स्वतःचं कंटाळलेपण मोडून काढण्यासाठी असेल कदाचित, त्या प्रौढ स्त्रीच्या व्यक्तिवातच एक अनाम आकर्षण दडून राहिलेलं असेल, कदाचित तसं नसेलही; पण चपट्या चेहऱ्याच्या, अनाकर्षक बसक्या नाकाच्या मंगोलियन वळणाच्या त्या तरुणाचं घट्टकट्टेपण मात्र इथे ठळकपणे जाणवून जातं.

मौनाचा मुखवटा समजून-उमजून घेऊन बसलेल्या त्या स्त्रीला तो या ना त्या मार्गानं बोलती करू पहातो. एकतर्फी बडबडत रहातो. म्हणतो, 'म्हणतात, स्त्रियांनी परक्या पुरुषांना चार हात दूरच ठेवावं आणि मीही एक परका पुरुषच की!'

ती कोणतीच प्रतिक्रिया दर्शवत नाही. त्याला वाटलं ती मुकी आहे. मग तो हवेतच आविर्भाव करून तिच्याशी संपर्क साधू पहातो, तर त्याचं ते नकलेपण पाहून ती खदखदा हसते आणि अभावितपणे त्याला दाद देते, तर तो आनंदून म्हणतो,

'म्हणजे तुम्ही मुक्या नाही तर! चक्क बोलताय की!'

त्यामागोमाग आणखी दोन पावलं पुढं जाऊन त्यानं तिला काही विचारणं स्वाभाविकच असतं.

'कुठे चाललायत?' ह्या त्याच्या प्रश्नाला ती टाळत नाही; पण त्या उत्तरानं तो अधिकच आनंदतो. कारण दोघांनाही एकाच शहरात जायचं असतं. मग तो एका स्टेशनवर उमद्या नायकासारखा धावत जाऊन तिच्यासाठी जेवणही घेऊन येतो आणि तिच्याबरोबरच्या वयस्क निर्विकार म्हातारीसाठीही. अर्थात ही म्हातारी तिची कोणी असली-नसली तरी त्याला त्याच्याशी घेणं-देणं नसतं. प्रथम ती संकोचते; मग ते पदार्थ स्वीकारते; पण त्याचे पैसे पुढे करून उद्गारते, 'मला उगाचच कुणाचीच मेहरबानी घ्यायला आवडत नाही!'

अखेर हा लांबलचक प्रवास एकदाचा संपतो. ते स्टेशनवर उतरतात. तो मित्राला

फोन लावतो, तर मित्र त्याला संध्याकाळी भेटायला बोलावतो. मग ह्याला दुसरा कसलाच उद्योग असत नाही. तो ती उतरलेल्या हॉटेलपुढं थांबून रहातो आणि ती तिथनं बाहेर पडताच तिला रस्त्यातच गाठतो. त्याला कुतूहल त्या म्हातारीबद्दलचं अधिक करून असतं. म्हणून विचारतो,

'ती म्हातारी कोण ? आई ?'

'नाही !'

'मग ?'

'रक्षक !'

'तुला आणि रक्षक! कुठल्या बँकेवर दरोडा घालणाऱ्या टोळीतली कुणी आहेस की काय ?'

तो खदखदून हसतो. ती विषण्ण होते. ती त्याला टाळू पहाते.

'तू उगाच माझ्यामागं येऊ नकोस !' असंही बजावते; पण तो माघार घेणाऱ्यातला नसतो. नेटानं तिच्या मागं रहातो. वाटेत ती फुलं विकत घेते; मग ते उतरत्या छपरांच्या, गल्ली-बोळांतून उतरत जाणाऱ्या वाटेनं थेट किनाऱ्याला जाऊन पोहोचतात. ते एक कबरस्तान निघतं. निरव शांतता, दाटीनं मांडलेली असंख्य नवी–जुनी थडगी, त्यातल्याच एका थडग्यावर ती फुलं वाहते. तो स्वतःजवळच्या लायटरनं मेणबत्ती पेटवतो तेव्हा मात्र तिचा घशात दाटून राहिलेला हुंदका बाहेर पडतो. पुन्हा एकदा तो विचारतो–

'आई ?'

ती आता ते नाकारत नाही.

मग ते किनाऱ्या–किनाऱ्यानं भटकतात. मनातला दुरावा काहीसा कमी होऊन जातो. तो तिला नाव विचारतो. ती म्हणते,

'काय की !'

'चिनी वळणाचं दिसतंय ! अर्थ काय त्याचा ?'

'तूच ओळख !'

'सदिच्छा ?'

'नाही !'

'शुभेच्छा ?'

'नाही !'

'कुठल्या संगीतकाराचं – कदाचित झाडाच्या एखाद्या जातीचंही असेल !'

'नाही ! काजवा !'

'काय सुंदर नाव आहे ! एखाद्या स्त्रीला हे नाव देण्याची कल्पनाच किती मोहक आहे !'

संध्याकाळ समुद्रावर उतरते. त्याला जाणंच भाग पडतं. तो पुन्हा भेटू म्हणतो. ती आधी नाकारते मग दुसऱ्या दिवशी दुपारी किनाऱ्यावरच्या हॉटेलात भेटायचं मान्य करते !

रात्री त्याचा मित्र भेटतो. एक नाही पण अनेकजण भेटतात. बँक–दरोडा प्रकरणातले हे सारे गुन्हेगार असतात. तो त्यांचा प्रमुख सूत्रधार ! तिथंही लूट वाटण्यावरून भांडणं जुंपतात. परिणामी एकाला जागच्या जागी भोसकण्यात येतं. ह्या जपानी चित्राच्या नायकाच्या रांगड्या व्यक्तित्वाला आता खराखुरा अर्थ येऊ लागतो. ठरल्याप्रमाणे, ठरल्या वेळीच ती त्या हॉटेलात जाऊन पोहोचते. त्याची दुपारभर वाट पहात रहाते; पण तो फिरकतच नाही. त्या खून-प्रकरणात तो चांगलाच गुंतलेला. ती निराश होते. दुपारच्या गाडीनं तिला परत फिरायचं असतं. मग ती परत फिरते, तर तो जीव खाऊन पळत येताना दिसतो. त्यांची स्वाभाविकच चुकामूक होते. तो आपला हेका सोडीत नाही. धापा टाकीत स्टेशनवर जाऊन पोहोचतो. तिला प्लॅटफॉर्मवर गाठतो, म्हणतो. 'माझ्याबरोबर चल !' विनवण्या करतो. ती ऐकायला तयार नसते.

'माझा भरोसा वाटत नाही ? केवळ मजा मारायच्या हेतूनं मी हे म्हणत नाही !'

तिचं समर्थन असतंच–

'मला जायलाच हवं. दुसरा पर्यायच नाही !'

'का ?'

मगच ती सांगते–

'मी कैदी आहे. नवऱ्याच्या खुनाबद्दल सात वर्षांची सजा भोगत्येय. तुरुंगातल्या चांगल्या वागणुकीबद्दल सवलत म्हणून वर्षातून एकदा आईच्या थडग्याला भेट द्यायची परवानगी मिळते म्हणून इथे आलेय. बरोबरची वयस्क बाई तुरुंगातलीच रक्षक आहे. उद्या सकाळी आठच्या आत टोकियोच्या तुरुंगात परत पोचायलाच हवं !'

तो गुन्हेगारच. हे ऐकून क्षणभर हादरतो; पण क्षणात सावरतो. तर ती अखेरचं म्हणून सांगते–

'कृपा करून आता तरी माझ्या मागं येऊ नकोस !'

ती सरळ गाडी गाठते. मग हाही धावतो. तिघांचाही परतीचा प्रवास सुरू होतो. परिस्थितीचा संदर्भच पालटून गेलेला असतो.

आता मनं अधिक जवळ आलेली. भावना वाहात्या झालेल्या. गाडीत तिच्याशी कोटाखालून का होईना, तो तिच्या स्पर्शाचा आधार शोधत राहतोच. पुढे मध्येच अपघातानं गाडी अडकते. हा तिला पळून जाऊयात म्हणतो, तर ती 'पस्तीस वर्षांच्या आयुष्यात माणसाला बरंच काही अनुभवायला मिळतं' असं सांगून त्याला टाळू पाहते. मग त्या वृद्ध रक्षक स्त्रीची नजर टाळून तो तिला बाहेर काढतोदेखील. ती पळण्यासाठी म्हणून त्याच्याबरोबर यार्डापर्यंत जाते आणि मग तिचं तेही उसनं अवसान गळून पडतं. अचानक मग तोच तिला पटवतो.

'आपण खूप दूर जाऊयात. अशा गावात राहू या की जिथे कुणीच आपणा दोघांनाही चुकूनही ओळखणार नाही. लग्न केलं नाहीस तरी चालेल. भाऊ–बहीण म्हणूनही रहायला हरकत नाही !'

ती त्याचं प्रपोजल नाकारते. बाह्य जीवनातल्या अस्थिरतेपेक्षा तुरुंगाच्या गजाआडची स्थिरताच तिला अधिक मोलाची असते. दोघंही परततात. तोवर बँक–दरोडा-प्रकरण, त्यातून घडलेल्या खुनाची वार्ता जगजाहीर केली जाते. त्याच्या मागावर असलेले पोलीस थेट रेल्वेगाडीतच येऊन त्याच्या पाठीवर राहतात. त्याला ह्या कसल्याच घडामोडींची जाणीव नसते.

सकाळी टोकियोला गाडी पोहोचते. तुरुंगाच्या दारापर्यंत हा बरोबरच असतो. मग त्या रक्षक स्त्रीला विनंती करून तिला तुरुंगात चांगलं अन्न मिळायचं नाही म्हणन काही छान पदार्थ आवर्जून खाऊ घालतो. अखेर ती आत जाते. गजांच्या दारावर डोकं आपटत हा तिला विचारतो,

'पुन्हा कधी भेटशील ?'

'आणखी दोन वर्षांनी !'

'खूपच होतात ! मला तुझ्यावाचून राहता येणार नाही !'

मग तो रडू लागतो. गजांवर डोकं आपटतो. तीच विचारते,

'तुझं नाव ? मी तुला ते विचारलंच नाही !'

'अकीरा !'

'चिनी वळणाचंच आहे. अर्थ ?'

'Cheers !'

तीही रडतच असते. मग घाईगर्दीनं त्याला सांगते,

'आजपासून बरोबर दोन वर्षांनी बागेत भेट. वाट पहाते !'

तो परत फिरतो. तिच्यासाठी म्हणून काही लोकरी कपडे खरेदी करायला जातो तर त्या दुकानातच त्याच्या पाठीवर असलेले पोलीस त्याला पकडतात. तो विरोध करतो; पण त्याला आता कसलाच अर्थ नसतो. बरोबर दोन वर्षांनी ती तुरुंगातून सुटते. बागेत ठरलेल्या ठिकाणी त्याची वाट पहात रहाते; पण बँक–दरोडा आणि मग खून-प्रकरणात पकडला गेलेला तो आता तिथे येणारच नसतो. कधीच येऊ शकणार नसतो.

तो नायक होता, ती नायिका होती; पण सामाजिक संदर्भात ती दोघंही सारखीच गुन्हेगार होती तिनं आपल्या दारुड्या नवऱ्याचा जाणूनबुजून खून केलेला, तर त्यानंही आधी बँक लुटून मग त्या प्रकरणातला आपलाच एक सहकारीही संपवलेला ! परिस्थितीच्या संदर्भात ते एकत्र येतात–आधी शरीरानं आणि मग मनानं. अर्थात त्यांची ही भावनिक जवळीक काळालाही अमान्य असते, असंच म्हणावं लागेल. ❑

चित्रपट : द मीटिंग प्लेस
देश : जपान

श्री भगवान उवाच : पृष्ठ ४ वरून

कोणी डोळे मिटे, कोणी टेकी डोके
स्वतःला कोणी हवेत फेके
घेताना दाद देई कोणी झोके
स्व-शरीरास ।

इथले श्रोते रसिक, दर्दी
कळो ना कळो, करिती गर्दी
वाटून जागा अर्धी अर्धी
पसरताती ।

ठेवणीतले काढूनि कोट
कोणी झाकती विशाल पोट
लावती लाली, कोणी रंगविती ओठ
आपुलेच ।

पाव-वडे आणि कषायपान
धूम्रकांड्या आणि विड्याचं पान
खाणं-पिणं, जमलं तर ऐकणं
चालतसे ।

आणिक कोणी तंबाखू चोळती
टाळी देऊन करती गोळी
कोणी आपले लीलया लोळती
कोचांवरी ।

पाहिले एकदा मीही हे सारे
प्रश्न एक मी मलाच विचारे
कशाला हा ताप, कशाला बरे
करिताती ।

कशाला जागरण तीन रात्रींचे
जाऊन घरी दिवसा झोपायचे
किंवा हपिसामध्ये पेंगायचे
तीन दिवस ।

सोसून थंडी, शिशिराचे वारे
का बरं जमती हे जन सारे
का आणि कसे या एक विचारे
त्रस्त मी ।

नाही मला झोप, नाही कशात सुख
जाणण्याचे सत्य, मज लागली भूक
सारखी मनास तीच रुखरुख
रात्रंदिवस ।

शेवटी एकदा मिळाले उत्तर
करून विचार दिवस सत्तर
शुभ्रजलामध्ये जैसा काळा फत्तर
तैसेच बा ।

विकूनिया काही पोटं भरती नेक
कोणी पाव-वडे कोणी चहा केक
लॉटरीचीही तिकिटे देख
विकताती ।

वाहनें सांभाळून पैसे मिळताती
वाड्यांचे मालक सोय पाहती
स्कूटरी–सायकली ठेवूनी घेती
कित्येकांच्या ।

कोणी धूम्रकांड्या, कोणी वेफर्स विकी
कोणी पान-चुना,कोणी काकड्या-चिक्की,
मारतसे कोणी दाण्याची फक्की
गर्दीमध्ये ।

कोणास कला दावण्याची हौस
कोणाला फक्त मंचाचा सोस
चढून उतरावे यात संतोष
कित्येकांचा ।

श्रोत्यांतही काही ऐकाया येती
काही जण ते इतरा ऐकविती
सांगून खऱ्या-खोट्याच स्मृती
रंजविती एकमेका ।

जळो जिणे लाजिरवाणे
उरुसास या न जाणे
न कळले तरी जाऊन येणे
महत्त्वाचे ।

त्याच्याच गप्पा पुढे चालती
आठ दिवस सारे बोलती
आप्पा, अण्णा वा मधु-मालती
सर्वजण ।

हा तर केवळ मनुष्यस्वभाव
लोंढा गेला, तिकडे आपणही जावं
तिथंच राहावं, त्यात रमावं
जाण पार्था ।

मीही गेलो होतो, गेलास तूही
जातील असेच जन कित्येकही
विषाद वाटण्या कारण नाही
तुज-मजला ।

–सतीश कामत


# टॉलस्टॉय – एक माणूस

लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.